मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १२९ ■ शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514










# मुंबईचा 'किंग' कोण?

## आज फैसला ! २३ केंद्रांवर होणार मतमोजणी

**दैनिक युवक आधार**

**संपादक संतोष आमले :** मुंबई महापालिकेची निवडणूक गुरुवार, १५ जानेवारी रोजी पार पडली. तर आज शुक्रवारी १६ जानेवारी रोजी मतमोजणी करण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या रिंगणातील राजकीय पक्षांच्या संख्याबळाचे चित्र शुक्रवारी संध्याकाळपर्यंत स्पष्ट होणार आहे.

मुंबई स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी गुरुवारी मतदान पार पडल्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी मतमोजणी होणार आहे. मुंबई महापालिकेने मतमोजणीसाठीची तयारी आधीच पूर्ण केली असून २३ ठिकाणी मतमोजणी पार पडणार आहे. यावेळी मतमोजणी उशीरा सुरू होणार आहे. या मतमोजणीकडेही सगळ्या राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. मतमोजणीसाठी 'पाडू' यंत्रणा प्रथमच वापरण्यात येणार असून या यंत्रणेविषयी राजकीय पक्षांनी संशय व्यक्त केला आहे. त्यामुळे शुक्रवारी होणाऱ्या मतमोजणीतही गोंधळ होण्याची शक्यता आहे. मंबई महापालिकेत कोणाची सत्ता येणार याचे चित्र आज स्पष्ट होणार

मुंबई महापालिकेची निवडणूक गुरुवार, १५ जानेवारी रोजी पार पडली. तर शुक्रवारी १६ जानेवारी रोजी मतमोजणी करण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या रिंगणातील राजकीय पक्षांच्या संख्याबळाचे चित्र शुक्रवारी संध्याकाळपर्यंत स्पष्ट होणार आहे. त्यामुळे उमेदवारांची धाकधूक वाढली आहे.

मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी २२७प्रभागांसाठी एकूण २३ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार शुक्रवार, १६ जानेवारी रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. मतमोजणी प्रक्रियेसाठी प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाअंतर्गत अभिरक्षा कक्ष (स्ट्राँगरुम) व मतमोजणीची ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. या सर्व ठिकाणांना सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलिस खात्याकडून आवश्यक ती मान्यता प्राप्त झाली आहे. या २३ ठिकाणीमतमोजणी पार पडणार आहे.

मुंबई महापालिकेकडे एकून २० हजार कंट्रोल युनिट आणि २५ हजार बॅलेट युनिट आहेत.

ही यंत्रे विक्रोळी आणि कांदिवली येथील गोदामांमध्ये ठेवण्यात येणार आहेत.

### १४ टेबल आणि एका वेळी दोन प्रभागांची मोजणी

मतमोजणीच्या दिवशी प्रत्येक प्रभागासाठी १४ टेबल असतील. एका वेळी दोन प्रभागांची मतमोजणी सुरू करण्यात येईल. ती पूर्ण झाली की पुढील दोन प्रभागांची मतमोजणी करण्यात येणार आहे. त्यामुळे संपूर्ण निकाल येण्यास आठ ते दहा तास लागण्याची शक्यता निवडणूक विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

### मतमोजणीला उशीर का ?

दरवेळी निवडणुकीची मतमोजणी सकाळी ८ वाजता सुरू होते. मात्र यावेळी मतमोजणी १० वाजता होणार आहे. मतदानानंतर सलग दुसऱ्या दिवशी मतमोजणी होत असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. गुरुवारी मतदान पार पडल्यानंतर सगळी यंत्रे जमा करण्यास शुक्रवारची पहाट उजाडण्याची शक्यता आहे. त्यानंतर लगेचच सकाळी ही यंत्रे मतमोजणी केंद्रावर पोहोचण्यासाठी वेळ लागेल, हे गृहित धरून मतमोजणी उशीरा सुरू होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### काय आहे 'पाडू' यंत्रणा ?

मतमोजणीत तांत्रिक अडथळे येऊ नये म्हणून यंदा विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. मुंबई महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये मेसर्स भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड बेंगलुरू या कंपनीची मतदान संयंत्रे वापरण्यात येणार आहेत. या मतदान यंत्रांद्वारे नोंदवलेल्या मतांची मतमोजणी करताना कंट्रोल युनिटला बॅलेट युनिट जोडूनच करणे आवश्यक आहे. जर कंट्रोल युनिटला बॅलेट युनिट जोडूनही मतमोजणी करताना तांत्रिक अडथळा येत असेल तर याच कंपनीने विकसित केलेल्या पाडू (प्रिंटींग ऑक्सिलरी डिस्प्ले युनिट) यंत्राचा वापर करून मतमोजणी प्रक्रिया पार पाडण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार १४० पाडू यंत्रे मुंबई महापालिकेला अतिरिक्त म्हणून प्राप्त झाली असल्याची माहिती पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिली.

## अबोली महिला रिक्षा संघटनेतर्फे मतदारांसाठी मोफत सेवा



**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** नुकतेच पार पडलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी निवडणूक आयोगाकडून विविध उपाययोजना राबवण्यात आल्या. याच पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत अबोली महिला रिक्षा संघटनेतर्फे एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला.

अबोली महिला रिक्षा संघटनेचे अध्यक्ष संतोष भगत यांच्या पुढाकाराने प्रभाग क्रमांक १२ मध्ये मतदारांना त्यांच्या घरापासून मतदान केंद्रापर्यंत व मतदानानंतर पुन्हा घरी सोडण्याची मोफत रिक्षा सेवा उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचण्यासाठी मोठा दिलासा मिळाला.

या सेवेमुळे अनेक मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदानात सहभाग घेतला असून लोकशाही प्रक्रियेला बळ मिळाले आहे. "मतदान हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आणि कर्तव्य आहे. कोणत्याही अडचणीमुळे कोणीही मतदानापासून वंचित राहू नये," अशी भूमिका अध्यक्ष संतोष भगत यांनी व्यक्त केली.

अबोली महिला रिक्षा संघटनेने लोकशाही बळकट करण्यासाठी उचललेली ही खारीचा वाट सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे. सामाजिक जाणीव ठेवून राबवलेल्या या उपक्रमाबद्दल नागरिक, स्थानिक कार्यकर्ते आणि विविध स्तरांतून अध्यक्ष संतोष भगत व त्यांच्या संघटनेचे अभिनंदन केले जात आहे.

## शेलघरचे तुकाराम नारायण घरत यांची अकरावी पुण्यतिथी साजरी

### वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महेंद्रशेठ घरत यांची जासई हायस्कूलला दहा संगणकांची भेट

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांचे वडील दिवंगत तुकाराम नारायण घरत यांची अकरावी पुण्यतिथी बुधवारी साजरी करण्यात आली. तुकाराम नारायण घरत यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत हिरीरीने सहभाग घेतला होता. त्यावेळी त्यांना तुरुंगातही जावे लागले, परंतु ते मागे हटले नाहीत. त्यांनी त्याकाळी शैक्षणिक, सामाजिक चळवळ राबवली. तोच वसा आज महेंद्रशेठ घरत यांनी घेतला असून सामाजिक कार्यात त्यांनी सर्वसामान्यांच्या हृदयात स्थान निर्माण केले आहे. वडिलांच्या पुण्यतिथीनिमित्त महेंद्रशेठ घरत यांनी जासई हायस्कूलला दहा संगणकांची भेट देऊन आगळीवेगळी श्रद्धांजली वाहिली. हा कार्यक्रम उलवे नोड मधील 'भूमिपुत्र भवन'मध्ये झाला.




यावेळी माजी खासदार रामशेठ ठाकूर म्हणाले, "महेंद्रशेठ यांनी आपल्या वडिलांचा वारसा उत्तमरित्या चालविला आहे. दिवंगत ज. आ. भगत यांची प्रेरणा घेऊन तो सर्वच क्षेत्रांत धडाडीने काम करतोय. वडिलांच्या नावे ज्युनियर महाविद्यालय, तर आईच्या नावाने यमुना सामाजिक, शैक्षणिक संस्था सुरू करून गोरगरिबांसाठी शैक्षणिक कार्य त्याने जोमाने सुरू ठेवले आहे. त्याबद्दल त्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. आम्ही निवडणुकीपुरते राजकारण करतो, बाकी आमच्या मैत्रीत बाधा येणार नाही, याची काळजी आम्ही घेतो."

यावेळी 'पैशाने तुटली नाती' हे नाटक सादर करण्यात आले. आगरी बोली भाषेतील हे नाटक रसिकांनी डोक्यावर घेतले. खचाखच भरलेल्या 'भूमिपुत्र भवन'मध्ये रसिकांच्या टाळ्यांनी कलाकारांची मने जिंकली. भूमिपुत्र भवनमध्ये 'पैशाने तुटली नाती' हे पहिल्यांदाच नाटक सादर करण्यात आले. त्यामुळे कलाकार, रसिक यांच्या प्रेमाला भरते आले होते.

दिवंगत तुकाराम नारायण घरत यांना श्रद्धांजली वाहाण्यासाठी माजी खासदार रामशेठ ठाकूर, उरण नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, दिबांचे पुत्र अतुल पाटील, महेंद्रशेठ यांचे सासरेबुवा रामशेठ म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, माजी सरपंच वसंत म्हात्रे, साई मंदिरचे अध्यक्ष रविशेठ पाटील आदी शेकडो मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, यमुनाबाई सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या गव्हाण येथील न्यू इंग्लिश स्कूल आणि खारकोपर येथील दिवंगत तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेजमध्येही पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

# सिल्लोड येथे महामानवांच्या विचारांचा झाला जागर

## नामविस्तार दिन व बुद्ध विहार वर्धापन दिन उत्साहात साजरा

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** शहरातील स्थानिक डॉ. आंबेडकर नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन आणि नागसेन बुद्ध विहारचा वर्धापन दिन अत्यंत मंगलमय वातावरणात संपन्न झाला. या दुहेरी सोहळ्याच्या निमित्ताने महामानवांच्या सामाजिक समतेच्या आणि शैक्षणिक क्रांतीच्या विचारांना उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ . आंबेडकर नगर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित जनसमुदायाने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा






विजय असो' अशा घोषणा देत अभिवादन केले. त्यानंतर नागसेन बुद्ध विहार येथे सामूहिक बुद्ध वंदना व धम्म संचलन करण्यात आले.

याप्रसंगी आयोजित चर्चासत्रात नामविस्तार लढ्यातील ऐतिहासिक घडामोडींवर प्रकाश टाकण्यात आला. वक्त्यांनी आपल्या मार्गदर्शनात म्हटले की, "नामविस्तार हा केवळ नामकरणाचा विषय नसून तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा एक गौरवशाली लढा होता." भगवान गौतम बुद्ध यांचा शांतीचा संदेश आणि बाबासाहेबांनी दिलेली 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' ही त्रिसूत्री अंगीकारण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

या सोहळ्याला नामविस्तार लढ्यातील ज्येष्ठ कार्यकर्ते शेषराव आरके, भाई पोपट पगारे, एड. जी. एस. आरके, कैलास आरके, अरुण कोतकर, बंडू आरके, सखाराम आरके, प्रा. हरिभाऊ तपासे, प्रा. विजय वाकेकर, माजी उपनगराध्यक्ष संजय आरके, माजी नगरसेवक जितूभाऊ आरके यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच संदीप दांडगे, किशोर जाधव, गणेश आरके, प्रकाश बनकर, शेषराव म्हातारजी आरके, तेजराव आरके, सुनील पेंटर, दिलीप दांडगे, राहुल आरके, संतोष आरके, संजय रुखमाजी आरके, सुभाष सुरडकर, सीमा आरके, दीपक आरके, नंदू आरके, अनिल आरके, गजानंद आरके, संजय आरके, पांडू आरके, आकाश आरके यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, बौद्ध उपासक, युवक-युवती व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन आणि व्यवस्थापन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक भेट

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, पळासदळ, ता. एरंडोल, जि. जळगाव येथील प्रथम वर्ष बी. फार्मसी व डी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी बुधवार, दि. 14 जानेवारी 2026 रोजी शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत ग्रामीण रुग्णालय, होलसेल मेडिसिन डिस्ट्रीब्यूटर व पथोलॉजी लॅबोरेटरी, एरंडोल येथे अभ्यासभेट दिली.

या भेटीचा मुख्य उद्देश ग्रामीण रुग्णालयातील विविध विभागांना भेट देऊन त्यांची कार्यपद्धती प्रत्यक्ष जाणून घेणे हा होता. *ग्रामीण रुग्णालयात* विद्यार्थ्यांना बाह्यरुग्ण विभाग, अंतर्गत रुग्ण विभाग, औषध वितरण विभाग व शल्यचिकित्सा विभागाची सविस्तर माहिती देण्यात आली. या विभागांचे *कार्य व मार्गदर्शन वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक जाधव* यांनी केले. रुग्णालयातील इतर विभागांची कार्यपद्धती तसेच रुग्णांना औषधांचे वितरण कशा प्रकारे केले जाते, याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली.

यानंतर *डॉ. मुकेश चौधरी* यांनी विद्यार्थ्यांना संसर्गजन्य आजारांबाबत माहिती देऊन त्यापासून बचाव करण्याच्या उपाययोजनांबद्दल सखोल मार्गदर्शन केले.

तसेच *राजमुद्रा होलसेल मेडिसिन डिस्ट्रीब्यूटरचे संचालक श्री. सतीश पाटील* यांनी होलसेल मेडिसिन कशा पद्धतीने रिटेल




मेडिकल व्यावसायिकांपर्यंत पोहोचवले जाते, त्यामधील मार्जिन कसे ठरते तसेच औषधांची अल्फाबेटिकली किंवा कंपनीनुसार मांडणी कशी केली जाते, याबाबत माहिती दिली.

ह्युमन केअर डायग्नोस्टिकचे संचालक डॉ. रोहित ठाकूर* यांनी रक्त, लघवी तसेच इतर पथोलॉजी तपासण्यांचे अहवाल रोगनिदानासाठी किती महत्त्वाचे असतात, हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. तसेच *नितीशा मेडिकलचे संचालक श्री. हितेश कापडणे* यांनी किरकोळ औषध विक्री व्यवसायाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

या शैक्षणिक भेटीसाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व प्राचार्य डॉ. विजय शास्त्री तसेच संस्थेच्या सचिव सौ. रूपा शास्त्री यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. भेटीच्या आयोजनासाठी उपप्राचार्य डॉ. पराग कुलकर्णी व प्रा. जावेद शेख यांनी विशेष योगदान दिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. करण पावरा, प्रा. गायत्री सूर्यवंशी व प्रा. योगेश्वरी लोहार यांनी परिश्रम घेतले.

## घाटंजी तालुक्यातील 'मॉडेल स्कूल'ची कामे रखडली; जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी/महेश पेन्दोर :** जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील ४० शाळांची 'मॉडेल स्कूल' म्हणून निवड करण्यात आली होती. यामध्ये घाटंजी तालुक्यातील साखरा खुर्द, मानोली, जांबोरा आणि कुर्ली या चार मोठ्या शाळांचा समावेश आहे. मात्र, वर्ष उलटूनही या शाळांना जिल्हा खनिकर्म विकास निधीतून मिळणारा पैसा अद्याप पूर्णपणे उपलब्ध झाला नसल्याने बांधकामाची कामे रखडली आहेत. परिणामी, शेकडो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

शिक्षण विभागाने मार्च २०२४ मध्ये सादर केलेल्या प्रस्तावानुसार, २०० पेक्षा जास्त पटसंख्या असलेल्या या शाळांमध्ये नवीन वर्गखोल्या आणि अत्याधुनिक



सुविधा पुरवल्या जाणार होत्या. घाटंजी तालुक्यातील या शाळांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर होणे अपेक्षित होते. विशेष म्हणजे, या शाळांच्या जागेची पाहणी अभियंता आणि शिक्षण विभागाने करूनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. साखरा खुर्द आणि कुर्ली सारख्या शाळांमध्ये प्रत्येकी सुमारे ९९ लाख, तर मानोली आणि जांबोरा शाळेसाठी सुमारे ६० लाख रुपयांच्या निधीची तरतूद प्रस्तावात आहे.

या शाळांची कामे थांबल्याने विद्यार्थ्यांना जुन्या आणि अपुऱ्या खोल्यांमध्ये बसावे लागत आहे. जिल्हा खनिकर्म निधी हा जिल्ह्याच्या विकासासाठी असतो, त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी या विषयात वैयक्तिक लक्ष घालून थांबलेला निधी तातडीने वर्ग करावा आणि घाटंजीतील या शाळांचे बांधकाम सुरू करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी आता पालकांकडून केली जात आहे.

जिल्हा खनिकर्म विकास निधी (District Mineral Foundation - DMF) हा स्थानिक विकासासाठी असतो. घाटंजी तालुक्यातील ४ शाळांसाठी कोट्यवधींचा निधी प्रस्तावात असताना, तांत्रिक मंजुरी मिळूनही हा निधी प्रत्यक्ष शाळेच्या खात्यावर का पोहोचला नाही? याची सखोल चौकशी व्हावी.

## बहुजन समाज पार्टीकडून बहन कु. मायावतीजी यांचा जन्मदिन 'जनकल्याणकारी दिन' म्हणून साजरा

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे :** बहुजन समाज पार्टी विधानसभा साकोलीच्या वतीने आज दि. 15 जानेवारी 2026 रोजी दुर्गाबाई डोह यात्रा, कुंभली येथे राष्ट्रीय अध्यक्षा बहन कु. मायावतीजी यांचा जन्मदिन 'जनकल्याणकारी दिन' म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी सामाजिक बांधिलकी जपत जनहिताच्या विचारांवर आधारित उपक्रम राबविण्यात आले. उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बहन कु. मायावतीजी यांच्या सामाजिक न्याय, समता व वंचितांच्या हक्कांसाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. याप्रसंगी



बहनजीचा जन्म दिवस केक कापुन साजरा करण्यात आला. आणि सर्व कार्यकर्ता यानी फुले, शाहू, आंबेडकर चळवळ संपुर्ण राज्यात गतिमान करु अस प्रण घेतला. या कार्यक्रमाला चंद्रमुनी गोंडाने जिल्हा प्रभारी बसपा भंडारा, डॉ.महेंद्र गणवीर जेष्ठ पदाधिकारी बसपा, कार्तिक मेश्राम (अध्यक्ष, बसपा विधानसभा साकोली), प्रदीप कराडे सर (अध्यक्ष, बामसेफ साकोली), देवेंद्र मेश्राम (विधानसभा सचिव), शरद रंगारी, प्रबोधनकार भावेश कोटांगले, विलास रामटेके, कबिर खोब्रागडे, सम्यक खोब्रागडे, देवी कोटांगले, पराग टेंभूर्णे, राणी इलमकार, प्रज्ञा मेश्राम, राजकपूर रंगारी (अध्यक्ष, तालुका साकोली), पतीराम टेंभूर्णे , खुशाल नम्देश्वर,डी. डॉ.योगराज कान्हेकर,पंकज भांबोरे,राष्ट्रपाल हुमणे, नितीन रामटेके सर दिलीप राऊत यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम शांततामय व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. उपस्थितांनी बहुजन समाजाच्या सशक्तीकरणासाठी संघटन मजबूत करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला.

## जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने कोंडमळा येथील जि.प.पूर्व प्राथमिक आदर्श शाळेत पुस्तक पेटी प्रदान सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**चिपळूण(गुरुनाथ तिरपणकर) :** पाठ्यपुस्तका व्यतिरीक्त विविध प्रकाशनची उपयुक्त वाचनिय पुस्तके विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने जनजागृती सेवा संस्थेने मु.कोंडमळा,ता.चिपळूण येथील जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक आदर्श शाळेला४००पुस्तके भेट देण्यात आली. नुकताच हा पुस्तक पेटी प्रदान सोहळा जि.प.पूर्व प्राथमिक आदर्श शाळेच्या सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनोद घाणेकर हे उपस्थित होते.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक, समाजसेवक-संस्थेचे जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे, मुख्याध्यापक संतोष कदम, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,शाळा



व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.सर्व प्रथम शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गाण्यावर सर्वांग सुंदर समुह नृत्य करुन सर्वांनाच मंत्रमुग्ध केले.मुख्याध्यापक संतोष कदम यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने देण्यात आलेल्या पुस्तक भेट उपक्रमाचे कौतुक केले.त्यांच्या शालेयअंतर्गत या उपक्रमाचा फायदा होणार आहे.प्रमुख पाहुणे संस्थेचे जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे यांनी आपल्या मनोगतात आपण या शाळेचे माजी विद्यार्थी आहोत याचा अभिमानाने उल्लेख केला व शाळेला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनोद घाणेकर यांनी यांनी पुस्तक पेटी प्रदान सोहळ्याचे कौतुक केले व मुलांना शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना पाचारण करुन मुलांना व्याख्यान्याच्या माध्यमातून संस्थेने मार्गदर्शन व सहकार्य करावे असे सुचित केले,त्यांची ही मागणी संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी मान्य केली आहे. संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर आणि सहकारी यांनी संपूर्ण शाळेची पहाणी केली, स्वच्छता, उत्कृष्ट रंग रांगोळीच्या माध्यमातून केलेली कलाकुसर व कलाकृती, भिंतीवरील रेखाटलेली ज्ञानात भर घालणारी स्लोगन, संगणक रुम, प्रयोगशाळा, विद्यार्थ्यांसाठी वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी तयार केलेला वाचन कट्टा,मुलांनी सादर केलेली प्रात्यक्षिके हे सर्व पाहून ही शाळा उच्चतम शिखरावर आहे याची जाणीव झाली.अचानक शाळेला भेट देणाऱ्या उप शिक्षणाधिकारी मॅडम यांनी पुस्तक पेटी प्रदान सोहळ्याचे संस्थेचे कौतुक व अभिनंदन केले.हा कार्यक्रम संस्थेचे जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे यांनी पुढाकार घेऊन विशेष मेहनत घेऊन यशस्वी केला.याप्रसंगी शाळेतील शिक्षकांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते संस्थेचे शैक्षणिक सन्मानपत्र प्रदान करुन त्यांना सन्मानित करण्यात आले.

## पुसद येथे गरजूंसाठी ब्लँकेट व शेतकऱ्यांना फवारणी पंपांचे वितरण

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** पुसद तालुक्यातील गरजू कुटुंबांसाठी १४ डिसेंबर रोजी सावंगी, आसरपेंढ,घाटोडी येथे ऊसतोड मजुरांना थंडी पासून बचाव व्हावा म्हणून 100 ऊबदार ब्लँकेटचे वितरण केले तसेच १४ जानेवारी रोजी ५० शेतकऱ्यांना बॅटरीवर चालणारे फवारणी पंपांचे वितरण करण्यात आले यामध्ये हर्षी, वालतूर, मोखाड, मोहदरी, धनज, गांगणमाळ, धारमवाडी, पिंपळदरी, आडगाव, खैरखेडा, खडकदरी, पारध, गोपवाडी, चिलवाडी, गौळ खुर्द, खर्शी, येथील ग्रामीण भागातील गरीब शेतकरी बांधवांना मदत करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.या सामाजिक उपक्रमासाठी वसई धर्मप्रांताने आर्थिक सहकार्य केले असून, मा. बिशप मॅल्कम सेक्वेरा यांच्या मार्गदर्शनामुळे हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार



पडला. श्री. राजू गायकवाड व त्यांच्या टीमने लाभार्थ्यांची निवड व कार्यक्रमाची तयारी मोठ्या मेहनतीने केली. शाळेच्या कर्मचाऱ्यांचेही सहकार्य लाभले. लाभार्थ्यांनी या मदतीबद्दल आयोजकांचे मनःपूर्वक आभार मानले.

## कोटनांद्रा येथे आजपासून अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचा शुभारंभ

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** तालुक्यातील कोटनांद्रा येथील श्री अष्टसिद्धी विनायक गणपती संस्थानच्या कृपा आशीर्वादाने व समस्त ग्रामस्थ मंडळींच्या वतीने आयोजित १३ व्या भव्य 'अखंड हरिनाम सप्ताह' व 'संगीतमय श्रीमद् भागवत कथा' सोहळ्याचा मंगलमय प्रारंभ आज शुक्रवार (दि. १६) पासून होत आहे. या धार्मिक उत्सवामुळे कोटनांद्रा परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे भागवत कथा प्रवक्ते ह.भ.प. रामेश्वर महाराज मगर (नावडीकर) यांच्या रसाळ वाणीतून दररोज दुपारी ११ ते २ या वेळेत भाविकांना कथा श्रवण करता येणार आहे. सोहळ्याचे उद्घाटन आज सकाळी काकडा भजनाने होणार असून, सप्ताहामध्ये दररोज पहाटे ५ ते ६ काकडा भजन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ आणि रात्री ८:३० ते १०:३० या वेळेत नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत.

सप्ताहामध्ये ह.भ.प. नागेश महाराज कदम (परभणीकर), ह.भ.प. श्रीनाथ महाराज गोसावी (पैठणकर), ह.भ.प. विठ्ठल महाराज जाधव (वांझोळा), ह.भ.प. भरत महाराज बोबडे (श्रीगोंदा), ह.भ.प. रामाचार्य आदेश महाराज सातगावकर आणि ह.भ.प. गोरक्षनाथ महाराज काकडे यांच्या सुश्राव्य कीर्तनांची मेजवानी भाविकांना मिळणार आहे.

शुक्रवार दि. २३ जानेवारी रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. रामेश्वर महाराज मगर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल. त्यानंतर गावातून भव्य पालखी मिरवणूक व नगरप्रदक्षिणा काढली जाईल. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कोटनांद्रा येथील समस्त गावकडी मंडळी, भजन मंडळी व महिला मंडळ परिश्रम घेत आहेत. तरी परिसरातील भाविकांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नायलॉन मांजा विक्री व उडवणाऱ्या विरोधात कडक कारवाई करा!

### टायगर ग्रुप (महाराष्ट्र राज्य) संघटनेचे उपविभागीय अधिकारी यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी / राजू गायकवाड (मोहदरी) :** उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पतंग उडवणाऱ्या सह विक्रेत्यावर कठोर कारवाई नागरिकांना सतर्कतेचे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले होते.

नायलॉन म्हणजे मुळे पक्षी व मानवी जिथे धोका लक्षात घेता माननीय उच्च न्यायालय मुंबई नागपूर खंडपीठ यांनी मोटो जनहित याचिका क्रमांक 1/ 2021 मध्ये दिनांक 12 जानेवारी 2026 रोजी महत्वपूर्ण आदेश दिला आहे या आदेशानुसार नायलॉन मांजाचा वापर साठा व विक्री यावर संपूर्ण बंदी



घालण्यात आली असून उल्लंघन करणाऱ्या व दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

दरवर्षी तीळ संक्रात (मकर संक्रांतीच्या) दिवशी व महिनाभरात आपल्या परिसरात पतंग उडवण्याचा प्रकार सर्रास मोठ्या प्रमाणात शहरात पतंगबाजी केल्या जाते त्यात म्हणजे काही विक्रेते नायलॉन माजाची विक्री करतात जे मनुष्याच्या जीवितवास धोका निर्माण करू शकतात पशुपक्षी आणि घरातील लोकांना इजा होण्याची शक्यता असते विदयुत आणि केबल लाईनची सुरक्षा धोक्यात येते याकरिता येथील टायगर ग्रुप च्या वतीने 13जानेवारी रोजी पुसद उपविभागीय अधिकारी,पुसद शहर चे पोलीस निरीक्षक ठाणेदार शिवानंद वानखडे, पुसद नगर पालिकेचे मुख्य अधिकारी राऊत यांनाही निवेदन देऊन कार्यवाहीची उच्च न्यायालयाच्या खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करून नायलॉन मांजा विक्री व उडवण्यावर कठोर कारवायाची मागणी केली.

सदर निवेदनावर पुसद अध्यक्ष टायगर ग्रुप युवराज भीमराव कांबळे. बाळु ठाकूर, सुनील पवार, विष्णू शिकारे, सुरज ठाकूर, वीरेंद्र वाडस्कर, आशिष बुरडे, राहुल कुरील, विजय कोरडे,बाळु भगत, आकाश पांडे.

# रस्ते सुरक्षेबाबत जागरूकता अभियानात २४०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग (वार्ताहर) :** होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया यांनी महाराष्ट्रातील अलिबाग येथे जागरूकता अभियानाच्या माध्यमातून आपला देशव्यापी रस्ता सुरक्षा उपक्रम राबविला. या अभियानात एस. एम. वाडके हायस्कूल, बाबासाहेब नजरे हायस्कूल आणि सरदार राव बहादूर तेंडुलकर विद्यालयातील २४०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या उपक्रमातून रस्त्यावरील सुरक्षिततेविषयी शिक्षण, संवाद आणि सामायिक जबाबदारी यासाठी एक खुले व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. या मोहिमेचा मुख्य उद्देश रस्त्यावरील वर्तन प्रत्यक्षात समजून घेणे हा होता. संरचित सत्रांद्वारे सहभागी विद्यार्थ्यांना सुरक्षित वाहनचालक पद्धतींची मूलतत्त्वे, वाहतूक शिस्तीचे महत्त्व तसेच दैनंदिन प्रवासात जागरूकतेची भूमिका यांची ओळख करून देण्यात आली. या सत्रांमधून रस्ता सुरक्षा ही केवळ नियमांची अंमलबजावणी नसून ती एक दैनंदिन सवय आहे, जी वैयक्तिक तसेच सामूहिक कल्याणावर परिणाम करते, अशी जाणीव सहभागी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यात आली. या कार्यक्रमात संवादात्मक शिकण्यावर भर देण्यात आला, ज्यामुळे सहभागी विद्यार्थी रस्ता सुरक्षा संकल्पनांशी सक्रियपणे जोडले गेले. सुरक्षित वाहनचालक सिद्धांत सत्रे ही या मोहिमेची पायाभूत



रचना ठरली असून, त्याद्वारे महत्त्वाचे संदेश सहज आणि परिणामकारक पद्धतीने पोहोचविण्यात आले. या प्रदेशात दैनंदिन वाहतुकीत दुचाकी वाहनांचा मोठा वाटा असल्याने, विद्यमान तसेच भावी वाहनचालकांमध्ये माहितीपूर्ण व जबाबदार वर्तनाला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. मोहिमेदरम्यान दैनंदिन जीवनात वारंवार उद्भवणाऱ्या प्रत्यक्ष परिस्थितींवर चर्चा करण्यात आली, ज्यामुळे विद्यार्थ्यांना शिकलेले ज्ञान वास्तव जीवनाशी जोडता आले. जागतिक सुरक्षा घोषवाक्य 'Safety for Everyone' च्या मार्गदर्शनाखाली, होंडा (HMSI) मोबिलिटी आणि सुरक्षा यांचा समन्वय साधणारे भविष्य घडवण्यास कटिबद्ध आहे. शिक्षण आणि लहानपणापासूनच जागरूकता निर्माण करून, होंडा रस्ता सुरक्षा संस्कृती रुजवण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न करत आहे. यामुळे सुरक्षित पद्धती केवळ नियम न राहता स्वाभाविक सवयी बनतील आणि पिढ्यान्पिढ्या सुरक्षिततेची संस्कृती विकसित होईल.

# दारू–मटका घराघरात पोहोचला, संसार उद्ध्वस्त होताहेत

## जवळका पोलीस स्टेशन अंतर्गत गावांमध्ये महिलांचे अश्रू – जबाबदारी कोण घेणार?

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** (मालेगाव)जउळका पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या गावांमध्ये वरली मटका,गावठी दारू व देशी दारूचा अवैध व्यवसाय खुलेआम सुरू असून, याचा सर्वात मोठा फटका महिला,मुलं आणि कुटुंबव्यवस्थेला बसत आहे. वारंवार बातम्या,तक्रारी आणि परिसरातील संतप्त आवाज असूनही संबंधित ठाणेदारांकडून ठोस कारवाई होत नसल्याने महिलांचे जगणे असह्य बनले आहे.

आज अनेक घरांमध्ये सकाळची सुरुवातच भीतीने होते.दारू आणि मटक्याच्या व्यसनात अडकलेले पती,भाऊ, मुलगे यामुळे महिलांना आर्थिक चणचण, मानसिक त्रास आणि कधी-कधी मारहाणीला सामोरे जावे लागत आहे.लहान मुलांच्या शिक्षणावर परिणाम होत असून, घरातील शांतता पूर्णपणे नष्ट झाली आहे.

गावठी व देशी दारूच्या नशेत रस्त्यावर भांडणे,शिवीगाळ, एकमेकांना मारहाण करण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. महिलांना संध्याकाळनंतर घराबाहेर पडणे अवघड झाले असून,आई-वडील आपल्या मुलींच्या सुरक्षिततेबाबत कायम चिंतेत आहेत. हा प्रश्न आता केवळ कायदा-सुव्यवस्थेचा न राहता सामाजिक आपत्तीचे स्वरूप घेत आहे.

या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधण्यासाठी परिसरात वारंवार बातम्या प्रकाशित करण्यात आल्या,मात्र तरीही ठाणेदार लक्ष देत नसल्याचे चित्र कायम आहे, ही बाब अत्यंत वेदनादायक आहे. त्यामुळे आता नागरिक आणि महिलांकडून थेट सवाल उपस्थित केला जात आहे की,



"जर ठाणेदार दुर्लक्ष करत असतील, तर लोकप्रतिनिधी ठाणेदारांना समजवून सांगणार का?

वरिष्ठ, कव्हरेज अधिकारी यांना या गंभीर स्थितीची माहिती देऊन कारवाईस भाग पाडणार का?"

लोकप्रतिनिधी, प्रशासन व वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी याकडे फक्त कागदावर नव्हे तर प्रत्यक्ष जमिनीवर उतरून लक्ष देणे गरजेचे झाले आहे. कारण दारू–मटका थांबला नाही, तर अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होण्याची भीती महिलांकडून व्यक्त होत आहे.

महिलांची आणि कुटुंबांची ठाम मागणी आहे की,

१)जउळका पोलीस स्टेशन अंतर्गत गावांमधील वरली मटका व अवैध दारू तात्काळ बंद करावी

२)दोषींवर कठोर कारवाई करून अड्डे कायमचे उद्ध्वस्त करावेत

३) लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी यांनी थेट हस्तक्षेप करून ठाणेदारांची जबाबदारी निश्चित करावी

४)अन्यथा महिला व कुटुंबांच्या सुरक्षेसाठी संघटित आवाज उठवला जाईल,असा इशारा आता उघडपणे दिला जात आहे.जनतेच्या सुरक्षेतेचा प्रश्न राजकीय नसून सामाजिक जबाबदारी आहे.निष्क्रिय ठाणेदार आणि गप्प लोकप्रतिनिधी हे लोकशाहीसाठी धोकादायक ठरू शकतात असं सर्वसामान्य जनतेचे मत आहे..

# पाच लक्षवेधक तंत्रज्ञान नवकल्पनांसह एक्सयूव्ही ७एक्सO सादर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** भारतातील आघाडीची एसयूव्हीउत्पादक कंपनीमहिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडने आज आपली नवीन एक्सयूव्ही ७एक्सO सादर केली. एक्स-शोरूम १३.६६ लाख रु. किमतीपासून सुरू होणारी ७एक्सO ही २०२१ मध्ये सादर झाल्यापासून तीन लाखहून अधिक ग्राहक मिळवणाऱ्या गेमचेंजर एक्सयूव्ही ७०० ने निर्माण केलेले मापदंड आणखी उंचावते. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्रगल्भतेला अभूतपूर्व उंचीवर नेत एक्सयूव्ही ७एक्सO ही प्रीमियमएसयूव्ही अनुभवाचे नियमच नव्याने लिहित आहे. तंत्रज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या दिशेने महिंद्राने सातत्याने प्रयत्न केले असून, एक्सयूव्ही ७एक्सO मध्ये बेस व्हेरियंटपासूनच प्रगत वैशिष्ट्ये देऊन ही बांधिलकी अधिक दृढ केली आहे. सर्व निश्चित मानकांसह कोस्ट-टू-कोस्ट ३१.२४ सेंटीमीटर ट्रिपल एचडी स्क्रीन, इंटलिजन्ट अड्रेनॉक्स, वायरलेस अँड्रॉईडऑटो आणि ॲपल कारप्ले, चॅटजीपीटीसह अलेक्सा बिल्ट इन, क्रुझ कंट्रोल, पुश बटण स्टार्ट/स्टॉप आणि ७५ सुरक्षा वैशिष्ट्ये असलेला एएक्स व्हेरियंट अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्रीमियम सुविधा अधिक सुलभ करतो.



**पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत शकुंतला रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आ प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी सहकुटुंब मतदान केले.**

**( दैनिक युवक आधार)**

# दैनिक युवक आधार घडवणारा संघर्ष... नाव एकच – राजू शिंदे

## युवक आधार म्हणजे तुमचं स्वप्न, तुमची ओळख आणि तुमची ताकद

दैनिक युवक आधार हे फक्त एक वृत्तपत्र नाही, तर ते अनेकांच्या आयुष्याला दिशा देणारे एक व्यासपीठ आहे. या व्यासपीठामागे ज्यांचे घामाचे थेंब, जागोजागी धावपळ, न संपणारी काळजी आणि न थकणारी मेहनत दडलेली आहे, त्या नावांपैकी एक अत्यंत महत्त्वाचे नाव म्हणजे आदरणीय राजू शिंदे सर.

राजू शिंदे सरांनी दैनिक युवक आधारसाठी केवळ काम केले नाही, तर त्यांनी या संस्थेला आपलं कुटुंब मानलं. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रतिनिधी उभे करताना त्यांनी अनेकदा स्वतःच्या सुख-दुःखाकडे दुर्लक्ष केले. अनेक रात्री झोप न घेता फोनवर चर्चा, मार्गदर्शन, समजावणी—हे सगळं त्यांनी मनापासून केलं, कारण दैनिक युवक आधार त्यांच्या हृदयाच्या खूप जवळ आहे.

आज काही क्षणी नाराजी आहे, वेदना आहेत... पण त्या वेदना दुर्लक्षामुळे नाहीत, त्या अपेक्षांमधून जन्माला आलेल्या आहेत. ज्याला आपली संस्था आपली वाटते, तोच माणूस दुखावतो. ज्याला फरक पडत नाही, तो कधीच अस्वस्थ होत नाही. तुमची नाराजी ही कमकुवतपणाची



नाही, तर संस्थेवरच्या निखळ प्रेमाची साक्ष आहे.

तुमचा स्वभाव थोडा आक्रमक आहे, हे खरे. पण ही आक्रमकता रागाची नसून, ती कामाबाबतच्या प्रामाणिकपणाची आहे. हलगर्जीपणा, दुर्लक्ष, वेळेचा अपमान—या गोष्टी तुम्हाला अस्वस्थ करतात, कारण युवक आधार केवळ नाव नाही, तर तुमचं स्वप्न आहे.

आज युवक आधार जिथे उभा आहे, तिथपर्यंत पोहोचण्यासाठी तुम्ही किती वेळा स्वतःला झोकून दिलं, हे शब्दांत मांडता येणार नाही. तुम्ही घडवलेले

**आदरणीय राजू शिंदे सर**

- युवक आधारला कुटुंब मानून अहोरात्र झटणारे व्यक्तिमत्त्व
- संपूर्ण महाराष्ट्रात प्रतिनिधी घडवण्यामागील प्रमुख आधार
- शिस्त, प्रामाणिकपणा आणि कामाविषयीची आक्रमक सकारात्मक भूमिका
- नाराजीतही संस्थेच्या भविष्याची चिंता करणारा खरा कार्यकर्ता
- युवक आधारसाठी आजही मार्गदर्शक, प्रेरणास्थान आणि बळ
- युवक आधारची ओळख शब्दांत मावणार नाही,कारण त्या ओळखीमागे राजू शिंदे सरांचा संघर्ष उभा आहे.

प्रतिनिधी, तुम्ही दिलेला आत्मविश्वास, तुम्ही रुजवलेली शिस्त—हे सगळं युवक आधारच्या प्रत्येक पानावर, प्रत्येक ओळीत जिवंत आहे.

नाराजी क्षणिक असते, पण तुमचं कार्य अमर आहे. आजही युवक आधार तुमच्याकडे पाहतो—मार्गदर्शक म्हणून, आधार म्हणून, आणि प्रेरणा म्हणून. तुमचा एक शब्द, एक सकारात्मक निर्णय अनेकांना पुन्हा उभं करू शकतो, हे तुम्हाला माहीत आहे.

आदरणीय राजू शिंदे सर, काही क्षण थांबून मागे वळून पाहा—तुमच्या कष्टांनी किती स्वप्नांना पंख मिळाले आहेत. आज जर मन थोडं जड वाटत असेल, तरी तो भार तुमच्या मोलाच्या कार्यामुळेच आहे. तो भार कमी करण्याची वेळ आली आहे.

नाराजी बाजूला ठेवा...

कारण दैनिक युवक आधारला आजही तुमच्या ताकदीची, तुमच्या शब्दांची आणि तुमच्या विश्वासाची गरज आहे.

तुमचं अस्तित्व हीच या संस्थेची सर्वात मोठी ताकद आहे.

पुन्हा एकदा उभं राहा, नव्या जोमाने...

कारण दैनिक युवक आधार म्हणजे तुमचं स्वप्न,

आणि स्वप्नं अर्ध्यावर सोडण्यासाठी नव्हे, तर पूर्ण करण्यासाठी असतात.

**शब्दलेखन...**

**करण धोंगडे..**

**वाशिम जिल्हा प्रतिनिधी दैनिक युवक आधार..**

**वाशिम जिल्हा संघटक माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समिती महाराष्ट्र राज्य.**

# एम.एड. सीईटी ऑनलाइन नोंदणीस प्रारंभ

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाकडून मास्टर ऑफ एज्युकेशन (एम.एड.) अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणाऱ्या सीईटी परीक्षेच्या ऑनलाइन नोंदणी प्रक्रियेस प्रारंभ करण्यात आला आहे. इच्छुक उमेदवारांसाठी ऑनलाइन अर्ज MAHACETच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

एम.एड. सीईटी परीक्षेची संभाव्य तारीख २५ मार्च असून, त्यासाठीची नोंदणी प्रक्रिया सध्या सुरू आहे. बी.एड. उत्तीर्ण तसेच डी.एड. व पदवी परीक्षा उत्तीर्ण उमेदवार एम.एड. अभ्यासक्रमासाठी पात्र ठरणार आहेत.

निफाड येथील म. वि. प्र. समाजाच्या ॲड. विठ्ठलराव हांडे बी.एड. महाविद्यालयात एम.एड. अभ्यासक्रम राबविण्यात येतो. प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी डॉ. मनिषा चौधरी (चित्ते) (मो. ९४२१८८६२६०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत बोरसे यांनी केले आहे.

# भव्य बक्षिसांची जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धा; सहभागी होण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस प्रतिनिधी उमेश साखरकर :** डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम स्पोर्ट्स अकादमी, दिग्रस यांच्या वतीने जिल्हास्तरीय खो-खो चॅम्पियनशिप २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही दोन दिवसीय स्पर्धा शनिवार, १७ व रविवार, १८ जानेवारी २०२६ रोजी येथील मॉनिटर क्लब इंग्लिश मिडीयम स्कूल जुना दारव्हा रोड येथे होणार आहे.

स्पर्धा मुली व मुले अशा दोन स्वतंत्र गटांत होणार असून दोन्ही गटांसाठी स्वतंत्र बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. विजेत्या संघास १० हजार रुपये तर उपविजेत्या संघास ५ हजार रुपये रोख बक्षीस दिले जाणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन विद्यानिकेतन शाळेचे अध्यक्ष व दिग्रस नगरपालिकेचे नवनिर्वाचित सदस्य डॉ. संजय बंग यांच्या हस्ते शहरातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.ही स्पर्धा इयत्ता ५ वी ते ८ वी मधील विद्यार्थ्यांसाठी खुली असून, जिल्ह्यातील कोणत्याही शाळेचे संघ या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. प्रवेश फी ५०० रुपये प्रति संघ अशी ठेवण्यात आली आहे.

नोंदणी व अधिक माहितीसाठी

आसिफ काजी – ९११२७७४१०९

सादिक गारवे – ७४४७२०१८७२

यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जयवंत सास्तिकर, फैजान शेख आणि फारुक चव्हाण यांनी केले आहे. स्पर्धा आयोजनात दिग्रस तालुका शारीरिक शिक्षण शिक्षक संघटना सहकार्य करीत आहे.

# रक्तदान आणि अन्नदान हे पुण्याचे काम : महेंद्रशेठ घरत

## साई मंदिरात महेंद्रशेठ घरत यांनी केले रक्तदान!

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** वहाळच्या साईमंदिरात गुरुवारी महेंद्रशेठ घरत यांनी रक्तदान केले. साई मंदिरात अन्नदान आणि रक्तदान हा दुग्धशर्करा योग साधणारे महेंद्रशेठ घरत हे राजकीय आणि सामाजिक समतोल साधणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहेत. हे त्यांनी आज केलेल्या रक्तदानातून दाखवून दिले. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले', असे म्हणतात ते महेंद्रशेठ घरत यांना तंतोतंत लागू होते. त्यांनी साई मंदिरात रक्तदान शिबिरात मार्गदर्शन




केले. ते म्हणाले, "रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. मी गेली अनेक रक्तदान करतोय. अनेकांचे जीव त्यामुळे वाचतात. त्यामुळे रक्तदान आणि अन्नदानासारखे पुण्य नाही. त्यामुळे मी आज दोन्ही गोष्टी एकाच वेळी करतोय. यात मला आनंद आहे. साई मंदिराच्या व्यासपीठावर अनेक समाजोपयोगी उपक्रम आणि कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध होत आहे. ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे."

श्रीमद रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांच्या अनुयायांनी वहाळच्या साईमंदिरात गुरुवारी रक्तदान शिबिर आयोजित केले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी साई मंदिर वहाळचे अध्यक्ष रविशेठ पाटील यांनी महेंद्रशेठ घरत यांचे स्वागत केले आणि रक्तदान केल्याबद्दल अभिनंदन केले.

# श्रीवर्धन तालुक्यात जिल्हा परिषद निवडणुकीचे वारे; विकास की आमिष, मतदारांची कसोटी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** श्रीवर्धन तालुक्यातील गावागावांमध्ये सध्या जिल्हा परिषद निवडणुकीची चाहूल लागली असून राजकीय हालचालींना वेग आला आहे. इच्छुक उमेदवार आणि पक्षांकडून विविध पद्धतीने मतदारांपर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न सुरू आहेत. काही जण मागील पाच वर्षांत केलेल्या कामांचा लेखाजोखा मांडत आहेत, तर काहीजण येत्या पाच वर्षांत काय विकासकामे करणार याची स्वप्ने दाखवत आहेत.

मात्र याचबरोबर काही ठिकाणी महिलांना भेटवस्तू देणे, आमिषे दाखवणे अशा मार्गांचाही अवलंब होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

विकास, पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, रोजगार यांसारखे मूलभूत प्रश्न बाजूला पडत चालले असून राजकारणाचा केंद्रबिंदू हळूहळू आमिषांच्या भोवती




फिरताना दिसत आहे.

ही परिस्थिती केवळ श्रीवर्धनपुरती मर्यादित नसून सध्या संपूर्ण महाराष्ट्रात राजकारण विकासाच्या मुद्द्यांवर न होता आकर्षक घोषणांवर आणि तात्पुरत्या लाभांवर चालत असल्याची शोकांतिका समोर येत आहे. यामुळे लोकशाहीच्या मूळ संकल्पनेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

आता खरा प्रश्न असा आहे की, मतदार नेमकं काय महत्त्वाचं मानणार? तात्पुरत्या लाभांना बळी पडणार की दीर्घकालीन विकासाचा विचार करून मतदान करणार?

आगामी जिल्हा परिषद निवडणूक ही केवळ राजकीय समीकरणांची नाही, तर मतदारांच्या जागरूकतेची आणि लोकशाहीची खरी कसोटी ठरणार आहे.

# खोपोली नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदी विक्रम साबळे

## ‘साबळे पॅटर्न’ची शहरात पुन्हा जोरदार चर्चा ; नवा अध्याय - साबीर शेख

## विक्रम साबळे यांनी महायुतीच्या सर्व पक्षश्रेष्ठींच्या विश्वासाचे मानले आभार

**दैनिक युवक आधार**

**खोपोली | प्रतिनिधी :** खोपोली नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदी विक्रम यशवंत साबळे यांची निवड झाल्याने शहराच्या राजकीय व सामाजिक वर्तुळात नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षांनंतर पुन्हा एकदा खोपोलीत ‘साबळे पॅटर्न’ची प्रभावी चर्चा सुरू झाली असून, विशेषतः युवक वर्गात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

सुप्रसिद्ध युवा उद्योजक, विक्रम फाउंडेशनचे अध्यक्ष तसेच सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात आपला ठसा उमटविणारे विक्रम साबळे हे दूरदृष्टी, कार्यक्षमता आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल साधणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या निवडीमुळे नगर परिषदेच्या कामकाजात सकारात्मक ऊर्जा संचारेल, असा विश्वास नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.







याचवेळी खोपोली नगर परिषदेच्या स्वीकृत नगरसेवकपदी शहरातील नामवंत व्यावसायिक व सामाजिक कार्यकर्ते दिनेश थोरवे (सुरभी ज्वेलर्सचे संचालक), माजी नगराध्यक्ष व सामाजिक जाणिवा जपणारे डॉ. सुनील गोटीराम पाटील, तसेच सातत्याने लोकोपयोगी कार्यात अग्रणी असणाऱ्या अश्विनीताई अत्रे यांची निवड झाल्याने नगर परिषदेच्या कार्यक्षमतेत मोठी भर पडली आहे.

**अनुभव, अभ्यास व समाजाभिमुखतेचा प्रभावी संगम**

विक्रम साबळे, दिनेश थोरवे, डॉ. सुनील पाटील आणि अश्विनीताई अत्रे ही सर्व मान्यवर व्यक्तिमत्त्वे गेल्या अनेक वर्षांपासून खोपोली शहरातील सामाजिक, धार्मिक व विकासात्मक उपक्रमांत सक्रिय सहभाग घेत आहेत. गरजू नागरिकांना मदतीचा हात, विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन तसेच शहराच्या विकासाशी संबंधित प्रश्नांवर ठाम भूमिका ही त्यांची ओळख आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेतच ही निवड झाल्याचे बोलले जात आहे.

**नागरिक व सामाजिक संघटनांकडून अभिनंदनाचा वर्षाव**

या निवडीबद्दल नागरिक, व्यापारी वर्ग, युवक कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संघटनांकडून उपनगराध्यक्ष विक्रम साबळे व तिन्ही स्वीकृत नगरसेवकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि सामाजिक जाणिवेचा खोपोलीच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चितच उपयोग होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. यावेळी पत्रकार बांधव व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**“लोकाभिमुख व पारदर्शक कारभाराला प्राधान्य” – विक्रम साबळे**

निवडीनंतर प्रतिक्रिया देताना उपनगराध्यक्ष विक्रम साबळे म्हणाले,“खोपोली शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच पारदर्शक व लोकाभिमुख कारभारासाठी मी प्रामाणिकपणे काम करत राहीन. सर्व राजकीय पक्षांची समंजस भूमिका आणि खोपोलीकरांचे प्रेम यामुळेच हा विश्वास शक्य झाला आहे. सर्वांचे मनःपूर्वक आभार.”

विक्रम साबळे यांच्यासह दिनेश थोरवे, डॉ. सुनील पाटील व अश्विनीताई अत्रे यांच्या निवडीमुळे खोपोली नगर परिषदेच्या कामकाजाला नवी दिशा मिळून शहराच्या विकासाला अधिक गती मिळेल, अशी आशा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.भाजप प्रदेश अल्पसंख्याक मोर्चा चे सदस्य साबीर शेख यांनी शुभेच्छा देत म्हणाले की संघर्षात जन्मदाता गुरू असले की जीवनात प्रत्येक टप्प्यात यशाचा नवा अध्याय सुरू होतो.या विजयाचे खोपोली शहरातील खरे शिल्पकार भाजप नेते यशवंत साबळे हे राजकारणातील किंग मेकर व्यक्तीमत्व ठरलेले दिसत आहे.

---

# ग्रो-कॅपिटल घोटाळ्यात सीईओंचे कठोर पाऊल; दुधे बंधूंवर निलंबनाची कारवाई

## प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस प्रतिनिधी उमेश साखरकर दिग्रस :** जिल्ह्यात खळबळ उडवून देणाऱ्या ग्रो-कॅपिटल कंपनीच्या कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणात अटक झालेल्या दोन शिक्षकांवर अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. दिग्रस तालुक्यातील ईसापूरचे केंद्रप्रमुख गिरीश किसनराव दुधे आणि विठाळा जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक विनोदकुमार किसनराव दुधे यांना बुधवारी (ता. १४) जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी तातडीने निलंबित केले.

या निर्णयामुळे जिल्हा परिषद वर्तुळात एकच खळबळ उडाली असून, आर्थिक फसवणुकीत सहभागी शासकीय कर्मचाऱ्यांविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

**सात कोटींहून अधिकचा घोटाळा**

“जादा परतावा मिळेल” या आमिषाला बळी पडून जिल्ह्यातील शेकडो शिक्षक व कर्मचाऱ्यांनी ग्रो-कॅपिटल कंपनीत लाखो रुपयांची गुंतवणूक केली. या फसवणुकीचा आकडा ७ कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. आतापर्यंत दिग्रस पोलिस ठाण्यात ४० हून अधिक शिक्षकांनी तक्रारी दिल्या आहेत तर यवतमाळ व आर्णी येथेही स्वतंत्र गुन्हे दाखल झाले आहेत.

या गंभीर प्रकरणात दिग्रस पोलिसांनी दोन्ही दुधे बंधूंना ६ तारखेला अटक केली होती. त्यांना दोन वेळा ऐकून ७ दिवसांचा पोलिस कोठडीही सुनावण्यात आली होती. मंगळवारी दारव्हा सत्र न्यायालयाने दोघांची २३ जानेवारीपर्यंत न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे.दरम्यान, जिल्हा परिषद शिक्षण विभागाने दोघांच्या निलंबनाचा प्रस्ताव सीईओंकडे सादर केला होता. त्या प्रस्तावावर शिक्कामोर्तब करीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दोघांनाही निलंबित करून दारव्हा पंचायत समिती मुख्यालय दिले आहे.

**मुख्य सूत्रधार अजूनही मोकाटच!**

पोलिस तपासात ग्रो-कॅपिटलसह इतर दोन कंपन्यांच्या खात्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर संशयास्पद व्यवहार झाल्याचे उघड झाले आहे. मूळचा सांगली जिल्ह्यातील रहिवासी असणारा मनोज उर्फ विश्वास अशोक पाटील आणि वर्धा येथील पुष्पांजली दिनेश रंधेरिया यांच्यासह पाच जणांविरुद्ध गुन्हे दाखल आहेत. मात्र तपास यंत्रणांना अद्याप फरार आरोपींचा ठावठिकाणा लागलेला नाही. फसवणुकीचे मुख्य सूत्रधार अद्याप फरारच असल्याने गुंतवणूकदारांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे. आर्थिक गुन्हे शाखेकडे तपास वर्ग करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

---

# फुलसावंगीत व्याख्यानांची मेजवानी

## 'बेधुंदकार' गोविंद पोलांड व प्रा. निरंजन राठोड यांचे विद्यार्थ्यांना मिळणार मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**एम.डी.सुरोशे महागाव ( यवतमाळ) :** आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून, फुलसावंगी पत्रकार संघाच्या वतीने विद्यार्थी आणि पालकांसाठी एका विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध व्याख्याते 'बेधुंदकार' गोविंद पोलांड आणि प्रा. निरंजन राठोड हे उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.



शनिवार, दि. १७ जानेवारी रोजी ठिक ११ वाजता स्व. सुधाकरराव नाईक कला व विज्ञान महाविद्यालय, फुलसावंगी येथे संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे तहसीलदार महागाव अभय मस्के, ठाणेदार महागाव धनराज निळे, उपसरपंच कुणाल नाईक, डॉ.पुंडलीक आमले, डॉ. चंदन पांडे, प्रा. सुरेश राठोड, प्रा. विनोद राठोड, प्रा. सुधीर भाटे आणि प्रा. संदीप चंद्रवंशी.

प्रशासकीय अधिकारी व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत सध्याच्या स्पर्धात्मक युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळावी आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा, या उद्देशाने पत्रकार संघाने या उपक्रमाचे पाऊल उचलले आहे. गोविंद पोलांड यांची 'बेधुंद' शैली आणि प्रा. राठोड यांचे शैक्षणिक मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

पत्रकार दिनाचे औचित्य साधून सामाजिक उत्तरदायित्व म्हणून आम्ही हा कार्यक्रम आयोजित केला आहे. परिसरातील जास्तीत जास्त विद्यार्थी आणि पालकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा."

**फुलसावंगी पत्रकार संघ**

---

# जिल्हा परिषद हायस्कूल आष्टी येथे कबड्डी स्पर्धेतील विजेत्या संघाचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**हदगाव प्रतिनिधी विश्वदीप कांबळे :** आष्टी (ता. हदगाव) येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कबड्डी स्पर्धेत विजयी ठरलेल्या संघाचा आज गौरव करण्यात आला. या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका गंगासागर मॅडम यांच्या उपस्थितीत विजेत्या संघातील विद्यार्थ्यांना सुशील कदम यांच्या हस्ते वही व पेनचे वाटप करण्यात आले.



खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संघभावना व शारीरिक तंदुरुस्ती विकसित होते, असे मत मुख्याध्यापिका गंगासागर मॅडम यांनी यावेळी व्यक्त केले. तसेच विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रातही सातत्याने प्रगती करावी, असे आवाहन त्यांनी केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, शाळेतील शिक्षकवृंद व पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.

---

# कला, क्रीडा आणि मनोरंजनाचा महासंग्राम: कलाकार प्रीमियर लीग २०२६ पर्व २ रे उत्साहात संपन्न; स्टेप आर्ट एंटरटेनमेंट ठरले विजेते

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** कलाकार म्हटलं की केवळ अभिनय नृत्य आणि गायन असे समीकरण मागे सारत कलावंतांनी जेव्हा क्रिकेटचे मैदान गाजवले तेव्हा प्रेक्षकांना कला आणि क्रीडा यांचा अनोखा संगम पाहायला मिळाला कलाकार प्रीमियर लीग के. पी. एल. २०२६ चे २ रे पर्व १२ आणि १३जानेवारी २०२६ रोजी पारगाव येथील नानोबा मैदानात मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडले.



आयोजक स्वप्निल शेळके, (अभिनेता डान्सर कोरिओग्राफर) आणि अक्षय अनंत पाटील (गायक) कल्पेश दमडे (डीओपी) यांच्या पुढाकारातून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या लीग मध्ये केवळ कलाकारांसाठीच प्रवेश होता २५० हून आधिक गायक, अभिनेते, नर्तक इनफ्लूएन्सर्स, युट्युब आणि ब्लॉगर्स यांनी सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे पुरुष आणि स्त्रिया दोघांचाही समावेश होता .रायगड, ठाणे, अलिबाग, वसई ,नाशिक,पुणे अशा विविध भागातून कलाकार स्पर्धेसाठी एकवटले होते. या स्पर्धेत एकूण८ संघाने सहभाग घेतला होता. ज्यात चुरस पाहायला मिळाली. केक वर्ल्ड स्टुडिओ, वीर ताराराणी, ४ एंजल प्रोडक्शन्स, बजरंग बॉईज, स्टेप आर्ट इंटरटेनमेंट ,डीपी प्रोडक्शन, प्रवीण घासे प्रोडक्शन, आई एकविरा मेन्स ११, अटीतटींच्या सामन्यानंतर स्टेप आर्ट इंटरटेनमेंट या संघाचे (मालक पप्पू सूर्यवंशी) यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर डीपी प्रोडक्शनचे (मालक देवा पाटील) संघाने द्वितीय क्रमांक मिळवला. अन्य पारितोषिकांमध्ये मालिकावीर आतिश पाटील,उत्कृष्ट निवेदक (फ्रिज आणि सन्मान चिन्ह) उत्कृष्ट फलंदाज उदय मडवी( सायकल आणि सन्मानचिन्ह) उत्कृष्ट गोलंदाज संजय पाटील (सायकल आणि सन्मानचिन्ह )उत्कृष्ट क्षेत्ररक्षक गणेश कोळी (कुलर आणि सन्मानचिन्ह) पारितोषिक वितरण सोहळयासाठी पटेल ज्वेलर्स, निखिल सोनी पनवेल, (दीपक साडीचे मालक)तेजस डाकी(एस एस डी मोबाईल चे मालक) सुचित्र घरत (केक वल्ड चे मालक) प्रवीण घासे( स्मार्ट सिटी डेव्हलपर )अतुल म्हात्रे(शेकाफ खजिनदार ),प्रमोद अनंत पाटील, निलेश खारकर ,निकिता खारकर ,राहुल स्पोर्ट चे प्रभाकर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते .प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटेल ज्वेलर्स, द्वितीय क्रमांकाचे बक्षीस दीपक साडी पनवेल ,यांनी प्रायोजित केले होते

कलाकार प्रीमियर लीग चे २ रे पर्व केवळ मनोरंजनाचा धमाका नव्हते, तर कलाकारांमधील एकोपायचे आणि खेळाडू वृत्तीचे उत्तम उदाहरण ठरले .क्रिकेटच्या मैदानात रंगलेल्या या कलाकारांच्या सामन्याने सिद्ध केले की, कलावंत कोणत्याही क्षेत्रात आपले कर्तुत्व सिद्ध करू शकतात .पुढच्या वर्षी तिसऱ्या पर्वाची उत्सुकता शिगेला पोहोचवत हे दुसरे पर्व कलाकारांच्या स्मरणात आणि चाहत्यांच्या मनात घर करून गेले.

---

# माणगांव तालुक्यात राष्ट्रवादीला धक्का; घरोशीवाडी येथील मुंबईसह ग्रामस्थ मंडळाचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/सचिन पवार/माणगांव :** माणगांव तालुक्यातील घरोशीवाडी येथील मुंबईस्थित ग्रामस्थ मंडळाने शिवसेनेत जाहीर प्रवेश करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठा धक्का दिला आहे. अनेक वर्षे राष्ट्रवादी पक्षातील स्थानिक पुढाऱ्यांच्या भूलथापांना बळी पडल्यामुळे आमच्या गावाचा अपेक्षित विकास झाला नाही. या खोट्या आश्वासनांना कंटाळून आणि विकासाच्या विश्वासार्ह नेतृत्वावर विश्वास ठेवून आम्ही शिवसेनेत प्रवेश करत आहोत, असे मत प्रवेशकर्त्यांनी यावेळी व्यक्त केले.



हा जाहीर पक्षप्रवेश कार्यक्रम मा. ना. श्री. भरतशेठ गोगावले साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी उपविभाग प्रमुख श्री. संदीप गावडे, घरोशीवाडी शाखाप्रमुख श्री. रमेश भिसे, उपशाखा प्रमुख श्री. चंद्रकांत भिसे तसेच शिवसेनेचे इतर स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

शिवसेनेत जाहीर प्रवेश करणाऱ्यांमध्ये श्री. योगेश भिसे, श्री. प्रदीप भिसे, श्री. जयदास जाधव, श्री. शिवदास जाधव, श्री. सुनील भिसे, श्री. शैलेश जाधव, श्री. कैलास जाधव, श्री. सुरेश भिसे, श्री. जयेंद्र बबन भिसे, श्री. लक्ष्मण चव्हाण, श्री. विजय जाधव, श्री. रमेश रेणोसे, श्री. संदीप भिसे, श्री. पांडुरंग भद्रीके, श्री. महेश उतेकर, श्री. महेंद्र भिसे यांचा समावेश आहे.या पक्षप्रवेशामुळे माणगांव तालुक्यात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक बळकट होणार असून, घरोशीवाडी परिसरातील विकासाला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## “हतेडी खुर्दच्या मैदानात महिला मुख्याध्यापिकेची दहाड; विद्यार्थ्यांना कबड्डीचा रणसंग्राम!”

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी (बुलढाणा) :** आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवण्यासाठी केवळ वर्गखोल्या पुरेशा नसून मैदानाचीही तितकीच गरज आहे, हे बुलढाणा जिल्ह्यातील हतेडी खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.शिल्पा सुनील सरकटे यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे. महिला मुख्याध्यापिका स्वतः मैदानात उतरून विद्यार्थ्यांना कबड्डीचे धडे देताना दिसत असल्याने शाळेचे वातावरणच प्रेरणादायी बनले आहे.

सौ.शिल्पा सरकटे या केवळ अध्यापन आणि प्रशासनापुरत्या मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्ती, आत्मविश्वास,शिस्त आणि संघभावना वाढीसाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत.त्यांच्या या धाडसी व सकारात्मक भूमिकेमुळे विद्यार्थी मोठ्या उत्साहाने कबड्डीचा सराव करत असून ग्रामीण भागातील मुलांमध्येही खेळाविषयी नवी उमेद निर्माण झाली आहे.

> मैदानात उभी राहिलेली 'आई' त्या दिवशी शाळेचे मैदान नेहमीसारखे नव्हते पायात चप्पल चेहऱ्यावर आत्मीय हसू आणि डोळयांत विश्वास घेऊन मुख्याध्यापिका सौ. शिल्पा सुनील सरकटे विद्यार्थ्यांसमोर उभ्या राहिल्या. हातात सिटी नव्हती.तरीही प्रत्येक मुलांचे कान त्यांच्या आवाजाकडे झुकलेले होते.कारण त्या फक्त मुख्याध्यापिका नव्हत्या... त्या त्या क्षणी आईसारख्या मार्गदर्शक होत्या..

या उपक्रमाला सहाय्यक शिक्षिका अनिता किसन कापडे यांचे मोलाचे सहकार्य लाभत असून त्या विद्यार्थ्यांना खेळातील नियम, शिस्त आणि संघभावनेचे महत्त्व समजावून सांगत आहेत. तसेच शाळेशी संलग्न असलेल्या उत्कृष्ट अंगणवाडी सेविका शालिनी सरकटे या विद्यार्थ्यांच्या पोषण, उपस्थिती आणि प्राथमिक सवयी विकसित करण्यासाठी सक्रिय योगदान देत आहेत.

महिला नेतृत्वाखाली चालणारा हा उपक्रम केवळ खेळापुरता मर्यादित न राहता ग्रामीण शिक्षणाला नवी दिशा देणारा ठरत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील हतेडी खुर्द शाळेचा हा प्रयोग इतर शाळांसाठीही निश्चितच आदर्श ठरणारा आहे.

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा उत्साहात समारोप

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/ मारुती सत्रे :** येथील कालिका देवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित सात दिवसीय विशेष शिबिराचा समारोप मोठ्या उत्साहात पार पडला. या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. पांडुरंग सुतार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे हे होते व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.



संजय तुपे गजानन नागरी सहकारी बँकेचे सदस्य शरद ढाकणे माजी जिल्हा परिषद सदस्य खरमाटे मामा यांची प्रमुख उपस्थिती होती.

मार्गदर्शन करताना डॉ सुतार म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ उपक्रम नसून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, राष्ट्रप्रेम व स्वयंसेवेची भावना निर्माण करणारी चळवळ आहे. शिबिरातून मिळालेल्या अनुभवांचा उपयोग विद्यार्थ्यांनी आयुष्यभर करावा.ग्रामीण स्वच्छता, व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन यांसारख्या उपक्रमांत विद्यार्थ्यांनी दिलेल्या योगदानाचे त्यांनी कौतुक केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे म्हणाले की, शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी व सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी अशा शिबिरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे,असे त्यांनी नमूद केले.

या शिबिरात स्वच्छता मोहिम, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिर, जनजागृती फेरी आदी उपक्रम राबविण्यात आले. याचाही उल्लेख त्यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात केला कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे यांनी केले. तर सूत्रसंचालन डॉ. रमेश लाहोटी यांनी केले.

तर उपस्थितांचे डॉ. श्यामा लोमटे यांनी मानले या कार्यक्रमाला ग्रामस्थ, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी.स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वेळीच सीपीआर मिळाल्यामुळे वाचले 46 वर्षीय स्वयंसेवकाचे प्राण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** रसायनी रेल्वे स्टेशन परिसरात एक व्यक्ती मानसिक तणावाखाली विद्युत खांबावर चढल्याने अत्यंत धोकादायक परिस्थिती निर्माण झाली. या व्यक्तीला सुरक्षितरित्या खाली आणण्यासाठी सुरू असलेल्या बचाव कारवाईदरम्यान अनपेक्षित घटना घडली असून याठिकाणी झालेल्या अपघातात बचावासाठी पुढाकार घेतलेल्या हेल्प फाउंडेशनचे स्वयंसेवक विजय भोसले यांना वीजेचा धक्का बसून जीभेला दुखापत झाली, धुरामुळे श्वसनमार्गाला इजा झाली, त्वचा भाजली तसेच मणक्याला व बरगड्यांना फ्रॅक्चर झाले व ते बेशुद्ध पडून त्यांचा श्वासोच्छवासही थांबला. त्यामुळे क्षणार्धात अत्यंत गंभीर परिस्थिती उद्भवली आणि घटनास्थळी तातडीच्या वैद्यकीय मदतीची गरज निर्माण झाली. वेळीच सीपीआर देत रसायनी पोलीस स्टेशनजवळ जखमी झालेल्या हेल्प फाउंडेशनचे स्वयंसेवक विजय भोसले यांचे प्राण वाचविण्यात




मेडिकव्हर हॉस्पिटल्सला यश मिळाले आहे. या अपघातात बेशुद्ध पडलेल्या विजय भोसले यांचा श्वासोच्छवास थांबला असून यांनी या प्रसंगाचे गांभीर्य ओळखून हेल्प फाउंडेशनचे संस्थापक गुरुनाथ साठेलकर यांनी घटनास्थळी तात्काळ सीपीआर दिले, त्यामुळे श्री. भोसले यांचा त्यांचा श्वास पुन्हा पुर्ववत सुरू झाला. त्यानंतर त्यांना तातडीने मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे प्रादेशिक संचालक नीरज लाल यांनी या घटनेविषयी बोलताना सांगितले की, घटनास्थळी दिलेल्या सीपीआरमुळे रुग्णाचे प्राण वाचवणे शक्य झाले. मेडिकव्हर हॉस्पिटल्स हे आपल्या आपत्कालीन व अतिदक्षता सेवांच्या माध्यमातून समाजाला विश्वासार्ह आरोग्यसेवा देत असल्याचे या घटनेतून सिद्ध झाले आहे.

## पो.स्टे. गोंदिया शहर हद्दीत प्रतिबंधित नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या विरुद्ध कारवाई - स्थानिक गुन्हे शाखा , गोंदिया पोलीसांची कामगीरी

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड प्रतिनिधी जिल्हा (गोंदिया ) :** मा. पोलीस अधिक्षक गोंदिया श्री. गोरख भामरे सर यांचे निर्देशाप्रमाणे व पोलीस पोलीस निरीक्षक श्री. पुरुषोत्तम अहेरकर , स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया येथील पोलीस पथक जिल्हा हद्दीत अवैधधंदावर रेड कारवाई कामी पेट्रोलिंग करीत असताना गोपनिय माहीती मिळाली की, मरघाट रोड वरील संत श्री आसारामजी गुरुकुल समोर रोडवर एक इसम शासनाने प्रतिबंधीत मनाई केलेला



नायलॉन मांजा बाळगुण विक्री करीत आहे. या खबरेवरून नमुद ठिकाणी पोलीस पथकासह गेले असता एक इसम दिसून आला त्यास त्याचे जवळील बॅग ची पाहणी केली असता प्रतिबंधीत मनाई केलेले ०९ नग नॉयलॉन मांजा चक्री किमती ९०००/- रु व एक बॅग किमती १००/- रु असा एकूण ९१००/- रु माल मिळून आल्याने विधिसंघर्ष बालक वय १६ वर्ष राहणार मुर्री गोंदिया याचे विरुध्द पोलीस स्टेशन गोंदिया शहर येथे अप.क्र. ६२/२०२६ कलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, सहकलम २२३ भा.न्या.सं. २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधिक्षक श्री. गोरख भामरे यांचे निर्देशान्वये पोलीस निरीक्षक श्री. पुरुषोत्तम अहेरकर , स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया यांचे मार्गदर्शनात सहायक फौजदार राजू मिश्रा , पो.हवा महेश मेहर , प्रकाश गायधने , दुर्गेश तिवारी स्थानिक गुन्हे शाखा गोंदिया यांनी केली.

# नागपूर जिल्हा सिकलसेल मुक्त करण्यासाठी १५ जानेवारीपासून ‘अरुणोदय’ विशेष मोहीम

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** सिकलसेल सारख्या अनुवांशिक आजारातून भावी पिढीला मुक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद अंतर्गत ‘अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया मुक्त विशेष अभियान’ राबविण्यात येणार आहे. १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत चालणाऱ्या या मोहिमेद्वारे जिल्ह्यातील ० ते ४० वयोगटातील नागरिकांची व्यापक आरोग्य तपासणी आणि जनजागृती केली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातर्फे देण्यात आली आहे.

**जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी हे अभियान**

लोकचळवळीच्या माध्यमातून राबविण्याचे नियोजन केले आहे. या विशेष अभियानात संशयित रुग्णांची प्राथमिक तपासणी, 'HPLC' चाचणी, मोफत औषधोपचार आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे विवाहपूर्व व प्रसूतीपूर्व समुपदेशनावर विशेष भर दिला जाणार आहे.

**अभियानाची प्रमुख वैशिष्ट्ये**

सिकलसेल कुंडली: भविष्यातील पिढी सुरक्षित राहण्यासाठी लग्नापूर्वी तरुण-तरुणींनी सिकलसेल चाचणी करून आपली 'सिकलसेल कुंडली' जुळवणे आवश्यक आहे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

जनजागृतीसाठी त्या-त्या भागात गोंडी व इतर स्थानिक बोलीभाषेतील संदेश, ऑडिओ क्लिप्स आणि बॅनरचा वापर केला जाणार आहे.

शाळा, महाविद्यालये आणि आश्रमशाळांमध्ये प्रभातफेरी, प्रश्नमंजुषा, रांगोळी व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असून ग्रामपंचायत स्तरावर दवंडीद्वारे माहिती पोहोचवली जाणार आहे.

**मोहिमेच्या काळात तपासणी स्टॉल्स**

मोहिमेच्या काळात येणारे स्थानिक सण, यात्रा आणि धार्मिक उत्सवांमध्ये विशेष स्क्रीनिंग स्टॉल्स लावून नागरिकांची जागेवरच तपासणी केली जाईल. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.राजकुमार गहलोत, तालुका आरोग्य अधिकारी आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आशा स्वयंसेविका, ए.एन.एम. आणि स्वयंसेवक घरोघरी संदेश पोहोचवणार आहेत. या मोहिमेत लोकप्रतिनिधी, धर्मगुरू, सामाजिक कार्यकर्ते आणि प्रसारमाध्यमांचा सक्रिय सहभाग घेतला जाणार आहे.नागपूर जिल्ह्यातील सर्व वय 40 पर्यंतच्या सर्व नागरिकांनी, विशेषतः तरुण वर्गाने आपली सिकलसेल चाचणी करून घ्यावी आणि या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी मा.डॉ.राजकुमार गहलोत यांनी केले आहे.

## विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी बजावला मतदानाचा हक्क



**नागपूर :** विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी आणि जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी आज नागपूर महानगर पालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदानाचा हक्क बजावला. श्रीमती बिदरी यांनी प्रभाग क्रमांक १४ करिता रविनगर भागातील दादाजी धुनीवाले शाळेच्या मतदान केंद्रावर मतदान केले. डॉ. इटनकर यांनी प्रभाग क्रमांक १४ करिता पत्नी डॉ. शालिनी इटनकर यांच्यासह रविनगर भागातील सराव प्रशिक्षण संस्थेच्या आदर्श मतदान केंद्रावर मतदान केले. **( दैनिक युवक आधार)**

# शिरूरच्या बसस्थानकात प्रवाशांचे सुविधा अभावी हाल

## शिवसेनेचे तालुका प्रमुख आणि उपजिल्हा प्रमुख आंदोलन करणार

**दैनिक युवक आधार**

**शिरुर कासार :** शहरातील बस स्थानकात प्रवाशांचे सुविधा अभावी हाल होत आहेत. हा महत्त्वाचा प्रश्न लक्षात घेऊन शिवसेना (उबाठा) पक्षाचे तालुका प्रमुख सोपान मोरे व उजजिल्हा प्रमुख अजिनाथ खेडकर यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

शिरुर कासार तालुका बसस्थानकात पिण्यासाठी पाणी, स्वच्छतागृह, वीज या मुलभूत सुविधांअभावी प्रवाशांची कुचंबना, हेळसांड कायम सुरू आहे. याशिवाय सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे, पूर्वेळ कर्मचारी नियुक्त नसल्याने सायंकाळच्या पाच वाजेनंतर बसस्थानकात शांतता पसरते. रात्री लांब पल्याच्या बसमधील प्रवाशांना वाहक- चालक बसस्थनका ऐवजी चौकात उतरवतात. पोलिस कर्मचाऱ्यांचा राबता पहारा, सीसीटीव्ही कॅमरा या सुविधा उपलब्ध नाहीत. बसस्थानकातून प्रवाशी महिलांच्या पर्स, मौल्यावान सोने- चांदीच्या दागीने अशा चोरीच्या घटना समोर येतात. शिरुरच्या बसस्थानकावर पूर्ण वेळ पोलिस कर्मचाऱ्यांचीही नियुक्ती नाही.

प्रशासानाला मोठी दुर्घटना अपेक्षीत आहे का? असा प्रश्न प्रवासी नागरिकांतून होत असल्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख सोपान मोरे, उपजिल्हा प्रमुख अजिनाथ खेडकर यांनी बसस्थानकातील परिस्थितीचा आढावा घेत निष्क्रीय जबाबदार प्रशासना विरोधात संताप व्यक्त केला. शिरुर बसस्थानकासाठी नव्याने इमारत मंजूर झाली आहे, या पार्श्वभूमीवर बसस्थानकाच्या सुरक्षा भिंतीचे काम प्रगती पथावर आहे.

आधीच सखल भाग असल्याने बसस्थानकात पावसाळयात तळे साचते त्यामुळे एसटी बस बसस्थानकापर्यंत पोहोचत नाही.

नविन इमारातीचे स्ट्रक्चर उभारताना राजुरी (नवगन)- चिंचपूर मार्गाच्या संभाव्य उंची नुसार भरावा करण्यात यावा, प्रवाशांसाठी अद्यवत सुविधांचा समावेश करण्यात यावा यासह येत्या आठवभरात बसस्थानकात सुरळीत विज, स्वच्छ पाणी पुरवठ्यासह सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत. आदी मागण्यांची दखल घेवून अमंलबजावणी करण्यात यावी अन्यथा शिवसेना स्टाईलने तीव्र आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.

**पूर्णवेळ कर्मचारी नियुक्त नाही**

राज्यमार्ग परिवहन महामंडळ प्रशासनाला गेल्या २५ वर्षापासून शिरुर कासार तालुका बसस्थानकासाठी पूर्णवेळ कर्मचारी नियुक्तीसाठी महूर्त लागत नसल्याने संताप व्यक्त होत आहे. बीडहून पुणे-मुंबईकडे मार्गस्थ होणाऱ्या लांब पल्यांच्या एसटीबसच्या फेऱ्या वाढल्याने बसस्थानकात कायमस्वरुपी पोलिस आणि रापम कर्मचाऱ्यांची नियुक्ती आवश्यक आहे.

## सिकलसेल तपासणी विशेष अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबवा - पालकमंत्री डॉ.पंकज भोयर

**15 जानेवारी ते 7 फेब्रुवारी दरम्यान विशेष अभियान; आयपीएचएल प्रयोगशाळेचे आभासी पध्दतीने उद्‌घाटन**

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादक :** सिकलसेल आजाराचे अधिक प्रमाण असलेल्या 21 जिल्ह्यांमध्ये ‘अरुणोदय’ सिकलसेल तपासणी विशेष अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामध्ये वर्धा जिल्ह्याचा देखील समावेश आहे. आरोग्य विभागाने काटेकोरपणे नियोजन करुन जिल्ह्यात हे अभियान प्रभावीपणे राबवा, असे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते अरुणोदय सिकलसेल ॲनेमिया अभियान, बालवयीन असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाचा शुभारंभ आणि आयपीएचएल प्रयोगशाळेचे आभासी पध्दतीने उद्धाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. आमदार समीर कुणावार, आमदार राजेश बकाने, जिल्हाधिकारी



वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पोलिस अधीक्षक सौरभ अग्रवाल, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्निल बेले यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ.भोयर म्हणाले, सिकलसेल तपासणी अभियानात पुढाकार घेऊन कामे करा. योग्य उपचार, समुपदेशन व नियमित औषधोपचाराने सिकलसेलला प्रतिबंधित करता येईल. सिकलसेल आजाराचे लवकर निदान, रुग्णांना योग्य उपचार व संदर्भसेवा उपलब्ध करुन देणे अत्यंत महत्वाचे असून जिल्ह्यात एकही सिकलसेल रुग्ण तपासणीपासून वंचित राहू नये, अशा सूचना पालकमंत्री डॉ. भोयर यांनी दिल्या. आयपीएचएल प्रयोगशाळेमुळे आजारांच्या तपासण्या जलदगतीने होतील. नागरिकांनी सिकलसेल तपासणीसाठी सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

प्रास्ताविकात डॉ. सुंमत वाघ यांनी सांगितले, जिल्ह्यात 4 लाख 85 हजारांवर सिकलसेल तपासण्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये 1 हजार 245 रुग्ण आढळून आले आहेत. नागरिकांमध्ये जनजागृती, रुग्णांना मोफत औषधे, समुपदेशन, नियमित आरोग्य तपासणी, टेलीमेडीसीनद्वारे तज्ज्ञांचा सल्ला आदी सुविधा पुरविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री डॉ.भोयर व मान्यवरांच्याहस्ते सिकलसेल अभियानात उत्कृष्ट काम करणारे तंत्रज्ञ, पर्यवेक्षक, सिकलसेल स्वयंरोजगार सेवक, आशासेविका आदींचा सत्कार करण्यात आला. तसेच बाल्यावस्थेतील असंसर्गजन्य आजाराची माहिती देणारे चाईल्ड हुड इंटीग्रेड प्रोग्राम बुकचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन व आभार जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. प्रशांत वाडीभस्मे यांनी मानले. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी, आरोग्य विभागाचे कर्मचारी, आशा सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# भारज बु येथील राजेश दामधर यांना समाज भुषण राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर...!!

**दैनिक युवक आधार**
**वरूड सर्कल प्रतिनिधी/ ज्ञानेश्वर कुंडलिक निकाळजे** : जालना जिल्हातील जाफ्राबाद तालुक्यातील भारज बु येथील पत्रकार तथा राजकीय , सामाजिक कार्यकर्ते श्रीमान राजेश दौलतराव दामधर यांना नुकताच वैदर्भीयनाथ चॅरिटेबल ट्रस्ट या शासन मान्य फाऊंडेशनने छत्रपती शिवाजी महाराज समाज भुषण या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी नुकतीच निवड केली आहे. या निवडीचे पत्र राजेश दामधर यांना मिळाले आहे. हे गेल्या पस्तीस वर्षापासून निस्वार्थपणे सामाजिक कार्य करीत आहे. जनसामान्य माणसाच्या सुखदुःखात सहभागी होणे , वैवाहिक जुळवणी करणे , कोणत्याही शासाकिय , निमशासकीय कार्यालयामध्ये जाऊन सामान्य माणसाच्या अडी अडचणी सोडविणे , कौटुंबिक वाद



दुर करणे , शालेय , महाविधालया मध्ये शैक्षणिक बाबीवर लक्ष ठेवणे , आरोग्य विभागाचे लक्ष वेधणे , सांस्कृतिक कामात लक्ष देणे अशा गावातील लहान सहान कामात हस्तक्षेप करून सामाजिक कार्य करीत असतात या सर्व बाबीची, विषयाची , कार्याची दखल घेऊन या फाउंडेशनने या पुरस्कारासाठी निवड केली आहे. हा पुस्कार येत्या 18 जानेवारी 2026 रोज रविवार ला वाशिम जिल्हातील कारंजा [ लाड ] येथे देण्यात येणार आहे. वैदर्भीयनाथ चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्षा सौ पूनमताई एकनाथराव पवार आणि संस्थापक सचिव आदरणीय श्री एकनाथ भाऊ पवार यांनी हि निवड केली असल्याचे निवडपत्र देऊन कळविले आहे. हा पुस्कार मंत्री महोदय , लोकसभा सदस्य , विधानसभा सदस्य , जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते यांच्या उपस्थिति मध्ये देण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप आकर्षक सन्मानचिन्ह , मेडल , दुपट्टा, सन्मानपत्र , मानाचा फेटा , तथा पुष्पगुच्छ असे असणार असून सन्मानित करण्यात येणार असल्याचे नियुक्ती पत्रात म्हटले आहे तसेच पुरस्कर्त्यांनी सह कुंटूब किंवा दोन मित्र , नातेवाईक आणावे असेही सुचविले आहे. राजेश दामधर यांना नुकताच नागपूर येथील मदत या शासनमान्य संस्थेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकार हा राज्यस्तरीय पुरस्कार मदत या संस्थेचे सचिव आदरणीय श्री दिनेशबापू वाघमारे यांच्या हस्ते प्रदान केले आहे. राजेश दामधर हे महाविद्यालयीन काळापासून समाज सेवेची आवड असल्यामुळे आणि लिखाणाची , वाचणाची आवड असल्यामुळे कॉलेजला असल्यापासून पत्रकरिता करीत आहे. राजेश दामधर हे निष्कलंक , चारित्र संपन्न व्यक्तिमत्व आहे. त्यांनी आज पर्यंत जवळपास पस्तीस ते चाळीस प्रशिक्षण घेतलेले आहे. गावात , तालुक्यात आणि जिल्हात लहान सहान राजाकिय , सामाजिक पदे भुषविले असून ते सध्याही माहिती अधिकार संरक्षण व पोलीस मित्र समितीचे तालूकाध्यक्ष असून अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष आहेत तसेच दैनिक विश्वजगत या वृत्तपत्राचे आणि अंजिक्य न्यूज चॅनेलचे जिल्हा प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहे.

# संक्रांतीच्या वाणातून गाव स्वच्छतेचा निर्धार; सिरंजनीत प्रेरणादायी उपक्रम

## अंगणवाडीच्या नवीन सुसज्ज इमारतीचे लोकार्पण करण्यात आले

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी माधव काईतवाड बोरगडीकर हिमायतनगर :-** तालुक्यातील सिरंजनी येथे समृध्द पंचायतराज अभियानांतर्गत मकर संक्रांतीचे औचित्य साधून सिरंजनी गावात स्वच्छता चळवळ अधिक बळकट व्हावी या उद्देशाने गावातील महिलांना स्वच्छतेचा वाण म्हणून कचराकुंड्यांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे गाव स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी ठेवण्याच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल टाकण्यात आले आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. मेघा पवन करेवाड या होत्या. पंचायत समिती हिमायतनगरचे



विस्तार अधिकारी श्री. सुशीलकुमारजी शिंदे यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. यावेळी कृषी सहाय्यक श्री. विजय जंगीलवाड, अंगणवाडी पर्यवेक्षिका श्रीमती क्षीरसागर मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात समूह आरोग्य अधिकारी डॉ. श्री. प्रतापजी प्रभनकर यांनी महिलांना स्वच्छता, आरोग्य व आजार प्रतिबंध याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. घरगुती कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, ओला व सुका कचरा वेगळा करण्याचे महत्त्व यावर त्यांनी विशेष भर दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिरण्यगर्भ बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे सचिव व सामाजिक कार्यकर्ते श्री. पवन करेवाड यांनी केले. त्यांनी सांगितले की, स्वच्छता शिक्षण व आरोग्य क्षेत्रात महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून यापूर्वीही अनेक स्वच्छता विषयक उपक्रम राबविण्यात आले असून, श्रमदानातून राबविण्यात आलेला ग्रामस्वच्छता उपक्रम तालुक्यात चर्चेचा विषय ठरला होता. तसेच मागील पाच वर्षांत गावात सुमारे २.५ किलोमीटर बंदिस्त नालीचे बांधकाम करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामपंचायत अधिकारी यू. जे. पठाण मॅडम यांनी केले. या उपक्रमामुळे गावातील महिलांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण होऊन, गाव स्वच्छ व आरोग्यदायी ठेवण्याच्या दिशेने प्रभावी पाऊल उचलले गेले असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सिरंजनी येथील नवीन सुसज्ज अंगणवाडी इमारतीचे लोकार्पण करण्यात आले

### वरठाण–पाचोरा राज्य मार्गाच्या कामासाठी अल्टिमेटम;

# २६ जानेवारीपर्यंत काम न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : मौजे वरठाण ते पाचोरा (खडकेवळा हद्द) राज्य रस्ता क्रमांक ५४ वरील मंजूर रस्त्याचे अपूर्ण व अत्यावश्यक काम तात्काळ सुरू करून पूर्ण करण्यात यावे, या मागणीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, पद्मपूरा, छत्रपती संभाजीनगर येथील कार्यकारी अभियंता यांना ग्रामस्थांच्या वतीने ठाम निवेदन देण्यात आले आहे.सदर रस्त्याचे डांबरीकरण सन २०२३-२४ मध्ये मंजूर झाले असून निधी उपलब्ध असतानाही ठेकेदारामार्फत बीबीएम, डीबीएमसारखी कामे अर्धवट ठेवून कार्पेट व सिलकोटचे काम अद्याप पूर्ण करण्यात आलेले नाही. परिणामी रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.हा रस्ता मराठवाडा व खान्देशला जोडणारा महत्त्वाचा दुवा असून विद्यार्थी, शेतकरी, रुग्णवाहिका व शेतमाल वाहतुकीसाठी अत्यावश्यक आहे. सध्या अपघातांचे प्रमाण वाढले असून अनेकदा



रुग्णांना वेळेत उपचार मिळणे कठीण झाले आहे. रस्ता दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप असून दिनांक २६ जानेवारी २०२६ पर्यंत काम सुरू न झाल्यास टोकाचे आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. तसेच दोषी ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी सुनील माने, डॉ सुनील पाटील,भुषन महालपुरे,शरद महालपुरे,पंकज महालपुरे, सोमनाथ महालपुरे, विनोद महालपुरे,व पाचशे ते सहाशे नागरिकांच्या सहयांचे निवेदन दिले आहे.

# सराटेवडगाव - आनंदवाडी येथे स्वच्छता मोहीम वर वृक्ष लागवड मोठ्या उत्सवत राबविण्यात आला

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत आदर्श गाव सराटेवडगाव-आनंदवाडी येथे स्वच्छता मोहीम व वृक्ष लागवड या कार्यक्रमास आष्टी पंचायत समिती चे सन्माननीय गटविकास अधिकारी श्री.गोकुळ बागलाने साहेब व विस्तार अधिकारी श्री.बाळासाहेब जायभाये साहेब, विस्ताराधिकारी श्री. नागनाथ शिंदे साहेब उपस्थित राहून ग्रामस्थांना मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अधिकाधिक गतिमान करून आपले गाव स्वच्छ,सुंदर व समृद्ध कसे करता येईल त्यासाठी मार्गदर्शन केले



त्याचबरोबर लोकसहभागातून गावांतर्गत राबवल्या जाणाऱ्या स्वच्छते मोहीम तसेच विविध उपक्रमाबद्दल ग्रामस्थांचे कौतुक करत उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.या भेटीमुळे ग्रामपंचायतीच्या कामकाजास नवी ऊर्जा व प्रेरणा मिळाली.

या प्रसंगी गावातील जिल्हा परिषद शाळेसाठी ग्रामपंचायत कार्यालयाकडून स्मार्ट एलईडी मान्यवरांच्या हस्ते शिक्षक वृंदाकडे सुपूर्द करण्यात आला यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद व समाधान पाहण्यासारखे होते. सन्माननीय अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीच्या विकासकामांचा आढावा घेत मार्गदर्शन केले तसेच भविष्यातील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या यावेळी गावकऱ्या समवेत ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद शाळेसमोरील परिसर तसेच सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली व मान्यवरांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली ग्रामविकास, सामाजिक न्याय व सर्वसमावेशक प्रगती या उद्देशाने सुरू असलेले मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान निश्चितच गावाच्या उज्ज्वल भवितव्यास दिशा देणारे ठरत आहे.

या प्रेरणादायी भेटीबद्दल गटविकास अधिकारी श्री. गोकुळ बागलाने साहेब व विस्तार अधिकारी श्री. बाळासाहेब जायभाये साहेब, विस्तार अधिकारी श्री.नागनाथ शिंदे साहेब यांचे ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने मनःपूर्वक आभार..सर्व आजी- माजी सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी,सेवा सोसायटी चेअरमन, व्हॉईस चेअरमन, सर्व संचालक मंडळ, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य,शाळेतील विद्यार्थी, मुख्याध्यापक,शिक्षक वृंद, CRP ताई, महिला बचत गटातील अध्यक्ष, उपाध्यक्ष सर्व सदस्य सर्व कर्मचारी, युवक, महिला व पुरुष सर्व ग्रामस्थ आपण कार्यक्रमात सहभागी होऊन या कार्यक्रमाची शोभा वाढवली त्याबद्दल सर्वांचे आभार.... सर्वांनी जेवणाचा आस्वाद घेतला व कार्यक्रमाची सांगता झाली

# १८ जानेवारीच्या शासकीय योजना महाशिबिरासाठी पाटोद्यात भव्य मंडप उभारणीचे काम सुरू

**एक हजार लोकांची आसन व्यवस्था तर विविध शासकीय योजनांचे लागणार माहिती स्टॉल**

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** : दिनांक १८ जानेवारी रोजी पाटोदा येथे आयोजित करण्यात येणाऱ्या शासकीय योजनांच्या महाशिबिरासाठी जिल्हा व सत्र न्यायाधीश मा.आनंद एल.यावलकर यांच्या सूचनेनुसार तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीडचे सचिव मा.वहाब ए.सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली न्याय यंत्रणा व प्रशासनाच्या वतीने पूर्व तयारीला मोठा वेग आला असून कार्यक्रमाच्या तयारीचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. हे महाशिबिर पाटोदा येथील वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात पार पडणार असून या साठी माननीय उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तसेच जिल्हा न्यायाधीश व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत या शिबिरासाठी भव्य मंडप उभारणीचे काम सुरू आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी शासनाच्या विविध योजनांचे एकूण १४ ठिकाणी स्वतंत्र स्टॉल उभारण्यात येणार असून नागरिकांना एकाच ठिकाणी विविध योजनांचा लाभ मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या संकल्पनेतून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड, जिल्हाधिकारी



कार्यालय बीड तसेच तालुका विधी सेवा समिती पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने या महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी न्यायालयीन पातळीवरून सातत्याने नियोजन व आढावा घेण्यात येत आहे. पाटोदा न्यायालयाचे न्यायाधीश मा.एम.ए.शिंदे तसेच सहन्यायाधीश मा.सौ. एस.आर.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण पूर्व तयारीचा आढावा घेतला जात असून कार्यक्रमातील प्रत्येक बाबी वर बारकाईने लक्ष दिले जात आहे. न्यायालयीन कर्मचारी तसेच पाटोदा वकील संघाचे पदाधिकारी व सदस्यही मोठ्या परिश्रमाने या कामात सहभागी झाले आहेत. महाशिबिराच्या पार्श्वभूमीवर पाटोदा शहर व तालुक्यातील प्रमुख चौक, रस्ते व सार्वजनिक ठिकाणी बॅनर व फ्लेक्स लावण्यात आले असून फलकांद्वारे नागरिकांना माहिती दिली जात आहे. माहिती पत्रिकांचे वाटप सुरू असून रिक्षाद्वारे अनाउन्सिंग करून नागरिकांपर्यंत कार्यक्रमाची माहिती पोहोचवली जात आहे. या महाशिबिरात तहसील कार्यालय पाटोदा, पंचायत समिती पाटोदा, नगर पंचायत पाटोदा, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, एस.टी. महामंडळ विभाग, एस.बी.आय.बँक पाटोदा, वन विभाग, महिला व बाल विकास विभाग, सामाजिक कल्याण विभाग, एम.एस. सी.बी., तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पशुसंवर्धन कार्यालय तसेच जलसंधारण कार्यालय यांच्या वतीने विविध शासकीय योजनांचे स्टॉल लावण्यात येणार आहेत. या स्टॉलच्या माध्यमातून संजय गांधी निराधार योजना, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री स्वनिधी योजना (PM SVANidhi), आयुष्मान भारत कार्ड, रक्तदान शिबिर, शिष्यवृत्ती योजना, बचत गट योजना, कृषी व सूक्ष्म सिंचन योजना, पशुसंवर्धन व जलसंधारण विषयक योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्यात येणार आहे. या शासकीय योजना महाशिबिराचा लाभ पाटोदा शहर व तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आले आहे.

# माजी आ.भीमराव धोंडे यांनी रामकथेचे केले श्रवण;

## कथा निरूपणकार ह.भ.प.मंदार महाराजांच्या कौशल्याचे कौतुक

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे :** अध्यात्म हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. मनुष्याच्या अंतिम समाधानासाठी धार्मिक कार्यक्रमात सहभाग आवश्यक असून त्यातून मिळणारे समाधान हे अंतिम असते असे उद्गार आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी काढले. दरम्यान,धार्मिक कार्यात निसंकोचपणे सर्वांनी उपस्थित राहून धर्म वाढवण्यासाठी सर्वोतोपरी सहभागी व्हावे असे आवाहनही माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले.

आष्टी येथे आ.सुरेश धस आणि संयोजन समितीच्या वतीने संगीत रामकथा निरूपणकार मंदार महाराज रामदासी यांच्या कथेच्या आयोजन करण्यात आले आहे. माजी आ.भीमराव धोंडे यांनी आष्टी शहरात श्रीराम कथेच्या मंडपामध्ये आज आवर्जून उपस्थिती लावली.रामकथेत पाचव्या दिवशी माजी आ. भीमराव धोंडे यांनी भेट देऊन संगीत रामकथा निरूपणकार मंदार महाराज रामदासी यांच्या कथा निरुपणाच्या कौशल्याचे मन भरून कौतुक केले आणि या कथा आयोजकांचेही अभिनंदन केले. धार्मिक कार्यात्मिक संकोचपणे धर्म वाढवण्यासाठी आवर्जून उपस्थित असतो.



सर्व नागरिकांनी आणि भाविक भक्तांनीही अशा धार्मिक उपक्रमात सहभागी झाले पाहिजे अशी भावना त्यांनी व्यक्त केली.या संगीत राम कथेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून मानवी जीवनामध्ये सत्य,संयम,कष्ट, परिश्रम माणुसकी, मानवता, एकोपा, ऐक्य आणि सर्वधर्मसमभाव ही मूल्य मौल्यवान असतात.या मूल्याला अधोरेखित करण्याचे काम अर्थातच धर्म करीत असतो. त्या अनुषंगाने मानवता वादाचा सर्वांनी पुरस्कार करून अशा कथा निरूपणाला आवर्जून उपस्थित राहण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. यावेळी सौ प्राजक्ताताई धस, शैलजा थोरवे, सुखलाल मुथा, दिनकरराव तांदळे,अशोकदेवा जोशी, माजी सरपंच नामदेव राऊत, डॉ. मधुकर हंबर्डे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, प्रफुल्ल सहस्रबुद्धे,उत्तम बोडखे,प्रवीण पोकळे,सचिन रानडे,शरद रेडेकर,हौसराव आजबे,सतीशशेठ धस आदि सामाजिक, राजकीय, धार्मिक, क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**कथाकार ह.भ.प.मंदार महाराजांच्या पवित्रवाणीचा सुगंध दरवळला!**

आपल्या पवित्रवाणीतून आणि केलेल्या अभ्यासातून रामायणातील अनेक प्रसंग साक्षात जिवंत करण्याचे हातोटी आणि कौशल्य ह.भ.प. मंदार महाराज रामदासी यांना लाभलेले आहे.

त्यांच्या वाणीतून अनेक भाविक भक्तांमध्ये अध्यात्म समर्पणाचा भाव निर्माण होण्याची प्रेरणा निर्माण होईल असा विश्वास व्यक्त करत ह.भ.प.मंदार महाराज यांच्या कथा निरूपण कौशल्याचे मनापासून माजी आ.भीमराव धोंडे यांनी कौतुक केले आणि आयोजकांनाही धन्यवाद दिले.

# प्रभाग १९ मध्ये शाब्दिक वाद

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक 19 मध्ये शेकाप आणि भाजपच्या उमेदवारांमध्ये वाद पहावयास मिळाला. यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करत दोघांचा वाद मिटवला आणि दोन्ही पक्षाच्या उमेदवारांना बाहेर नेऊन त्यांना समज दिली. अनेक ठिकाणी पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता.

पालिका निवडणुकीत दुबार मतदारावरून भाजप आणि महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक वाद झाला. मतदानासाठी आलेल्या मतदारावर महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी आक्षेप घेत दुबार मतदार आहे त्याला लॉकअप मध्ये टाका अशी मागणी केली. यावर भाजप कार्यकर्त्यांनी आक्षेप घेतला.

मतदानासाठी आलेल्या मतदाराला धमकी देणं चुकीचं असून मतदाराला जाब विचारणारे हे कोण आहेत असा सवाल भाजप कार्यकर्त्यांकडून करण्यात आला. यावरून दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला.

शेवटी पोलिसांनी हस्तक्षेप करत दोघांनाही समज दिली.

# बोटावरील शाईबाबत तक्रारी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल महानगरपालिकेची निवडणूक 15 जानेवारी रोजी पार पडली. काही ठिकाणी छोटे मोठे वादाचे प्रसंग उद्भवले तर अनेकांनी बोटाला लावण्यात आलेल्या शाईबाबत तक्रारी केल्या. ही शाई साध्या पाण्याने व टिशू



पेपरने पुसली जात असल्याचा दावा करण्यात आला. मतदान केल्यानंतर मतदाराच्या बोटाला शाई लावली जात असे पूर्वी ही शाई किमान तीन ते चार दिवस जात नव्हती मात्र यावेळी मार्कर ने लावण्यात येणारी शाई सहज निघून जात असल्याचे अनेक मतदारांनी सांगितले. त्यामुळे ही बाब गंभीर आहे. याबाबत राज्य निवडणूक आयोग आणि निवडणूक यंत्रणांनी याची तातडीने दखल घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

# मतदारांना पैशाचे आमिष

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** वार्ताहर पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत मतदारांना घरपोच पैसे वाटप करून मते खरेदी केल्याचे दिसून आले. बुधवारी खारघरमध्ये सायंकाळी शेकापच्या कार्यकर्त्यांनी काही जणांना पैसे वाटप करत असताना निवडणूक विभागाच्या निदर्शनास आणन दिले.

त्यानंतर तळोजात देखील भाजपच्या कार्यकर्त्यांनी सव्वा लाखाची रोकड वाटताना एका कार्यकर्त्याला निवडणूक



विभागाला पकडून दिले. त्यामुळे अनेक ठिकाणी छूप्या पद्धतीने पाकिटातून मते खरेदी करण्याचा इरादा सर्वच पक्षांचा असल्याचे दिसून आले.

या प्रकरणी पोलीस ठाण्यात अदखलपत्र गुन्हा दाखल करण्यात आला. मतदारांना पैसे वाटप करणे हा फौजदारी अदखलपत्र गुन्हा आहे. त्यामुळे या गुन्ह्यात सापडल्यानंतर फारशी शिक्षा होत नसल्याने अनेक जण मतदारांना पैशांची पाकिटे वाटप करताना दिसतात.

**मताला दोन ते तीन हजार रुपयांचा भाव**

पनवेल पालिकेच्या निवडणुकीत चार मतांसाठी दोन ते तीन हजार रुपयांचा भाव असल्याचे दिसून आले.

त्यामुळे अनेक पक्ष पैशांचे वाटप करून हे निवडणूक लढवत असल्याचे दिसून आले.

# माँ जिजाऊंच्या विचारांचा जागर

## मराठा सेवा संघाच्या जिल्हा उपाध्यक्ष वैशालीताई आरु यांच्या निवासस्थानी जिजाऊ जन्मोत्सव व सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** मराठा सेवा संघाच्या जिल्हा उपाध्यक्ष सौ.वैशालीताई आरु यांच्या निवासस्थानी दिनांक 12 जानेवारी रोजी राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब यांचा जन्मोत्सव व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अत्यंत भक्तीभावाने, प्रेरणादायी वातावरणात व महिलांच्या मोठ्या उपस्थितीत साजरी करण्यात आली.

या प्रसंगी माँ जिजाऊ साहेब व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे विधीवत पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवमती सौ. सुरेखाताई आरु (जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय अध्यक्ष) या होत्या.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शहर पोलीस स्टेशनच्या महिला पोलीस नाईक कु. संगीताताई ढोले (महाराष्ट्र पोलीस) या उपस्थित होत्या. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर पावर लिफ्टिंग स्पर्धेत सुवर्ण व कांस्य पदक मिळवून वाशिम जिल्ह्याचा नावलौकिक




वाढवला आहे. तसेच आंतरराष्ट्रीय पर्यावरण बहुउद्देशीय संस्थेच्या शिवमती भाग्यश्री देशमुख मॅडम यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा सुरेखाताई आरु यांनी राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब यांच्या जीवनकार्याचा सविस्तर आढावा घेत, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांसारखा जाणता राजा घडवून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. मुघलशाहीविरोधातील संघर्षात माँ जिजाऊंचे योगदान आणि त्यांच्या संस्कारांमुळेच स्वराज्याची संकल्पना साकार झाली, असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या उपाध्यक्ष वैशालीताई आरु यांनी मराठा सेवा संघाची भूमिका स्पष्ट करत, संघाच्या माध्यमातून मराठी समाज सुरक्षित, संघटित व सशक्त होत असल्याचे सांगितले. संघाच्या कार्यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढत असून सामाजिक जागृती होत आहे, असेही त्यांनी नमूद केले.

प्रमुख पाहुण्या कु. संगीताताई ढोले यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "एक स्त्री जिद्दीने पेटली तर ती कोणतेही शिखर गाठू शकते. माँ जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या विचारांमुळेच आज महिला विविध क्षेत्रांत अग्रस्थानी आहेत." त्यांनी आपल्याला मिळालेल्या सुवर्ण व कांस्य पदकांमागील कठोर मेहनत, शिस्त व संघर्षाची प्रेरणादायी माहिती उपस्थित महिलांसमोर मांडली.

या कार्यक्रमास अश्विनीताई सरनाईक, माधुरी सोनुने, जयत्री पानझाडे, शारदा मकासरे, दिपाली सुरवसे, सोनल सूर्यवंशी, सुनिता कडणे, जिल्हा पदाधिकारी वैशाली बुंदे, तसेच महिला समुपदेशन केंद्राच्या समुपदेशिका मोहिनी पेंडके यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकांक्षा गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन वैशालीताई आरु यांनी केले. कार्यक्रमानंतर चहा-नाश्त्याने महिलांचे स्नेहसंमेलन झाले. अध्यक्षांच्या परवानगीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

माँ जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या विचारांनी महिलांना आत्मसन्मान, धैर्य व सामाजिक बांधिलकीची नवी दिशा देणारा हा कार्यक्रम ठरला.

# कानदुखी नाही, जबड्याचा 'फास'; सावधान!

## मानसिक ताणामुळे लागतंय 'लॉक' 'TMJ' आजाराचा विळखा


## दात घासण्याच्या सवयीतून ओढवताहेत गंभीर शस्त्रक्रिया

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** आपण रोज बोलतो, खातो, हसतो किंवा जांभई देतो; या सर्व क्रिया कानाजवळ असलेल्या 'टेम्पोरो-मॅन्डिब्युलर जॉइंट' (TMJ) या सांध्यामुळे शक्य होतात. हा सांधा मेंदू, स्नायू, लिगामेंट्स आणि दात यांच्यातील समन्वयावर काम करतो. मात्र, बदलती जीवनशैली आणि वाढत्या मानसिक तणावामुळे या सांध्याचे विकार (TMJ Disorders) सध्या मोठ्या प्रमाणात बळावत आहेत. अनेकदा कानाजवळ होणाऱ्या वेदनांना रुग्ण सामान्य समजून दुर्लक्ष करतात, परंतु हे दुर्लक्ष जबडा कायमचा 'लॉक' होण्यास कारणीभूत ठरू शकते, असा धोक्याचा इशारा प्रसिद्ध दंतचिकित्सक डॉ. किरण गावंडे यांनी दिला आहे.

**काय आहे हा आजार?**

T M J हा आपल्या शरीरातील सर्वात सक्रिय सांध्यांपैकी एक आहे, जो खालचा जबडा आणि कवटीला जोडतो. या सांध्यामध्ये असलेली मऊ 'डिस्क' जेव्हा आपली जागा सोडते किंवा त्यावरील स्नायूंवर अतिरिक्त ताण येतो,




तेव्हा हा विकार जडतो. वैद्यकीय भाषेत याला 'मॅक्सिलोफेशियल' समस्या मानले जाते, ज्याचे वेळेत निदान न झाल्यास चेहऱ्याची ठेवण आणि खाण्यापिण्याच्या सवयींवर गंभीर परिणाम होतो.

**ताणतणाव आणि 'ब्रक्सिझम'चा विळखा**

आजच्या धावपळीच्या युगात 'स्ट्रेस'मुळे अनेक व्यक्ती झोपेत दात घासतात (Bruxism). यामुळे जबड्याच्या सांध्यावर प्रचंड दाब निर्माण होतो. त्याशिवाय चुकीची चावण्याची पद्धत (Malocclusion), नखे खाणे, पेन चावणे किंवा अपघाती इजा यामुळेही TMJ चा त्रास उद्भवतो. अनेक रुग्णांमध्ये कानात आवाज येणे (Tinnitus) किंवा सतत डोकेदुखी होणे ही लक्षणे दिसतात, जी मुळात जबड्याच्या सांध्याशी संबंधित असतात.

**विना-शस्त्रक्रिया उपचार शक्य**

" T MJ आजाराचे निदान करण्यासाठी क्लिनिकल तपासणीसह आता CBCT आणि MRI सारख्या प्रगत तंत्रज्ञानाची मदत घेता येते. दिलासादायक बाब म्हणजे, ९० टक्के रुग्णांना शस्त्रक्रियेशिवाय केवळ औषधोपचार, 'नाईट गार्ड' आणि विशिष्ट व्यायामाद्वारे (Physiotherapy) बरे करता येते," असे डॉ. गावंडे यांनी स्पष्ट केले.

**॥ विशेष लक्ष द्या : ही आहेत धोक्याची लक्षणे ॥**

जबड्याचा आवाज: तोंड उघडताना-मिटताना 'कटकट' असा आवाज येणे.

लॉक जॉ: अचानक तोंड पूर्ण उघडणे बंद होणे किंवा जबडा अडकणे.

सततच्या वेदना: कानाजवळ, गालाच्या हाडाजवळ किंवा मानेत सतत कळ येणे.

सकाळचा जडपणा: झोपेतून उठल्यावर जबडा जखडल्यासारखा वाटणे.

कानात आवाज: कानामध्ये सतत गुंजारव किंवा शिट्टीसारखा आवाज येणे.

**टाळण्यासाठी काय करावे?**

कडक आणि च्युईंगमसारखे चिकट पदार्थ खाणे टाळावे.

जांभई देताना जबड्याला हाताने आधार द्यावा.

कोमट पाण्याने किंवा गरम कापडाने सांध्याचा शेक घ्यावा.

नखे खाणे किंवा पेन चावण्यासारख्या सवयी वेळीच थांबवाव्यात.

वेळेत निदान हाच उत्तम उपाय

कानाखालील भागात किंवा डोकेदुखीत वारंवार त्रास होत असल्यास तो केवळ पेनकिलर घेऊन दाबू नका. हा सांधा आपल्या चेहऱ्याच्या कार्याचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे अनुभवी दंतवैद्याचा सल्ला घेऊन उपचार सुरू करणे हिताचे ठरते, असे आवाहन डॉ. किरण गावंडे (ओम दातांचा दवाखाना, सिल्लोड) यांनी केले आहे.

संपर्क: 9420880915

# १९ वर्षांनंतर 'साडे माडे तीन' चित्रपटाचा शानदार पुनर्मिलन सोहळा, लवकरच येईल सीक्वेल

मराठी चित्रपटसृष्टीत काही चित्रपट असे असतात, जे काळाच्या पुढे जाऊनही प्रेक्षकांच्या मनात कायमस्वरूपी घर करून बसतात. १९ वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेला 'साडे माडे तीन' हा त्यातलाच एक. साधी गोष्ट, निरागस विनोद आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे प्रेक्षकांच्या मनात घर करणारे कुरळे ब्रदर्स, यामुळं हा चित्रपट आजही आठवणीत ताजा आहे आणि आता जवळपास दोन दशकांनंतर, हीच जादू पुन्हा एकदा अनुभवायला मिळणार आहे. येत्या ३० जानेवारी रोजी 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. त्याआधीच या चित्रपटाचा रियुनिअन सोहळा नुकताच मोठ्या दणक्यात पार पडला. या कार्यक्रमानं सगळ्यांनाच जुन्या आठवणींत हरवून टाकलं. या रियुनिअनमध्ये 'साडे माडे तीन'चा अविभाज्य भाग असलेले सचित पाटील, यांच्यासह 'पुन्हा एकदा साडे माडे तीन'ची संपूर्ण टीम उपस्थित होती. कुरळे ब्रदर्स पुन्हा एकत्र पाहून उपस्थितांमध्ये एक वेगळाच उत्साह संचारला होता. यावेळी 'पुन्हा एकदा साडे माडे तीन'च्या प्रमोशनल साँगचे बीटीएसही दाखवले होते.

**कुरळे ब्रदर्स पुन्हा करणार धमाल :** या कार्यक्रमात केवळ औपचारिक बोलणं नव्हतं, तर प्रचंड धमाल, मस्ती आणि खळखळून हसवणारे किस्से रंगले. शूटिंगच्या दिवसांतील गंमती-जंमती, पडद्यामागचे मजेशीर प्रसंग, सेटवरील आठवणी सगळंच पुन्हा जिवंत झालं. काही क्षण असे होते की, कलाकार स्वतःच




नॉस्टेलजिक झाले होते. प्रत्येकानं आपापले अनुभव शेअर करताना त्या जुन्या दिवसांची ऊब पुन्हा अनुभवली. दरम्यान, या सीक्वेलमध्ये झालेली रिंकू राजगुरुची एंट्री ही सध्या सगळ्यात जास्त चर्चेचा विषय ठरत आहे. दमदार भूमिका साकारण्यासाठी ओळखली जाणारी रिंकू, यावेळी थेट कुरळे ब्रदर्सच्या दुनियेत दाखल झाली आहे. आता ती या भावंडांमध्ये नेमका कोणता नवीन गोंधळ घालणार? तिची एन्ट्री कथेला कोणते वेगळे वळण देणार? हे सगळं चित्रपट प्रदर्शित झाल्यावरच उलगडणार आहे. पण इतकं मात्र नक्की की, तिच्या भूमिकेमुळं चित्रपटातील मजा आणखी दुप्पट होणार आहे.

**'पुन्हा एकदा साडे माडे तीन' चित्रपटाबद्दल :** 'साडे माडे तीन' पाहिलेल्या जुन्या प्रेक्षकांमध्ये या सीक्वेलबाबत आधीच प्रचंड उत्सुकता आहे. अनेकांसाठी हा चित्रपट म्हणजे त्यांच्या कॉलेजच्या, तरुणपणाच्या आठवणींशी जोडलेला आहे. तर दुसरीकडे, आजची तरुण पिढीही या कुरळे ब्रदर्सना नव्यानं ओळखण्यासाठी उत्सुक आहे.

# आयसीआयसीआय लोम्बार्डचे प्रीमीयम संकलन तिसऱ्या तिमाहीत १३.३ टक्क्यांनी वाढून ७०.४१ अब्ज रुपयांवर

वित्तीय वर्ष २०२६ च्या नऊमाहित कंपनीचे थेट प्रिमीयमरुपी ढोबळ उत्पन्न (जीडीपीआय) १/n आधारावर २१३.७२ अब्ज रुपयांवर पोहचले आहे. वित्तीय वर्ष २०२५ च्या नऊ महिन्यात २०६.२३ अब्ज रुपयांच्या जीडीपीआयच्या तुलनेत यंदाच्या नऊमाहित त्यात ३.६ टक्के वाढ झाली आहे. सर्वसाधारण विमा उद्योगाने या कालावधीत ८.७ टक्के वाढ साध्य केलेली आहे. पीक आणि समूह आरोग्य विम्याचे आकडे वगळल्यास वित्तीय वर्ष २०२६ च्या नऊमाहित कंपनीची जीडीपीआय वाढ ही १/n आधारावर ७.५ टक्के तर या उद्योगाची वाढ याच कालावधीत १३.३ टक्के राहिलेली आहे.

कंपनीचा जीडीपीआय १/n आधारावर वित्तीय वर्ष २०२६ च्या तृतीय तिमाहीत वित्तीय वर्ष २०२५ च्या तृतीय तिमाहीच्या ६२.१४ अब्ज रुपयांच्या तुलनेत ७०.१४ अब्ज रुपयांवर झेपावला आहे. या जीडीपीआयमध्ये उद्योगाच्या ११.५ टक्के वाढीच्या तुलनेत कंपनीने १३.३ टक्के वाढ नोंदविली आहे. पीक आणि समूह आरोग्य विम्याचे आकडे वगळल्यास वित्तीय वर्ष २०२६ च्या तृतीय तिमाहीत जीडीपीआयमध्ये कंपनीने १/n आधारावर १६.४ टक्के, तर उद्योगाने २०.१ टक्के वाढ साध्य केली आहे.

वित्तीय वर्ष २०२६ च्या नऊमाहित संयुक्त गुणोत्तर १/n आधारावर १०४.२ टक्के नोंदविले गेले आहे. हेच गुणोत्तर वित्तीय वर्ष २०२५ च्या नऊमाहित १०२.९ टक्के होते. n आधारावर संयुक्त गुणोत्तर वित्तीय वर्ष २०२६ च्या नऊमाहित १०३.१ टक्के तर वित्तीय वर्ष २०२५ च्या नऊमाहित १०२.८ टक्के इतके होते.

वित्तीय वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत संयुक्त गुणोत्तर १/n आधारावर १०४.५ टक्के नोंदविले गेले आहे. वित्तीय वर्ष २५ च्या तिसऱ्या तिमाहीत हे गुणोत्तर १०२.७ टक्के होते. n आधारावर संयुक्त गुणोत्तर वित्तीय वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत १०३.१ टक्के राहिले असून वित्तीय वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत हेच गुणोत्तर १०२.३ टक्के होते.

वित्तीय वर्ष २०२६ च्या नऊमाहितील ०.८४ अब्ज रुपये आणि वित्तीय वर्ष २०२५ च्या नऊमाहितील ०.९४ अब्ज रुपयांचा कॅट तोट्याचा परिणाम वगळल्यास संयुक्त गुणोत्तर अनुक्रमे १/n आधारावर १०३.७ टक्के आणि १०२.९ टक्के नोंदविले गेले आहे.

वित्तीय वर्ष २०२६ च्या तृतीय तिमाहीतील ०.११ अब्ज रुपयांच्या कॅट तोट्याचा परिणाम वगळल्यास संयुक्त गुणोत्तर १०४.३ टक्के इतके आहे. तर वित्तीय वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत कोणताही कॅट तोटा झालेला नाही.

२१ नोव्हेंबर २०२५ पासून लागू झालेल्या सामाजिक सुरक्षा संहिता २०२० च्या अंमलबजावणीनुसार, आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत ०.५५ रुपये अब्जचा परिणाम झाला. हा परिणाम वगळता, आर्थिक वर्ष २०२६ च्या नऊ महिन्यांसाठी आणि आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीसाठी १/ n आधारावर सीओआर अनुक्रमे १०३.९ टक्के आणि १०३.५ टक्के होता. हा परिणाम वगळता, आर्थिक वर्ष २०२६ च्या नऊ महिन्यांसाठी आणि आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीसाठी n आधारावर सीओआर अनुक्रमे १०२.८ टक्के आणि १०२.२ टक्के होता.

करपुर्व नफा (पीबीटी) वित्तीय वर्ष २०२५ च्या नऊमाहितील २६.५३ अब्ज रुपयांच्या तुलनेत वित्तीय वर्ष २०२६ च्या नऊमाहित १०.८ टक्क्यांनी वाढून २९.४१ अब्ज रुपयांवर झेपावला आहे.

वित्तीय वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीतील ९.६० अब्ज रुपये पीबीटीच्या तुलनेत वित्तीय वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत पीबीटीत ९.४ टक्के घसरण होऊन तो ८.७० अब्ज रुपयांवर आला आहे. भांडवली नफा वित्तीय वर्ष २०२५ च्या नऊमाहितील ७.९६ अब्ज रुपयांवरुन वित्तीय वर्ष २०२६ च्या नऊमाहित ९.३३ अब्ज रुपयांवर झेपावला आहे. वित्तीय वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीतील २.७६ अब्ज रुपयांवरुन भांडवली नफा वित्तीय वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत ३.१७ अब्ज रुपयांवर झेपावला आहे.

परिणामी, आर्थिक वर्ष २०२६ च्या ९ महिन्यांत १/n आधारावर करपश्चात नफा (PAT) ११.३ टक्क्याने वाढून २२.२५ अब्ज रुपयांवर झेपावला आहे. हा नफा आर्थिक वर्ष २०२५ च्या नऊमाहित १९.९९ अब्ज रुपये होता. आर्थिक वर्ष २०२६ च्या ९ महिन्यांत n आधारावर करपश्चात नफा १३.८ टक्क्याने वाढून २२.२२ अब्ज रुपयांवर पोहचला आहे. आर्थिक वर्ष २०२५ च्या नऊमाहित तो १९.५३ अब्ज रुपये होता. आर्थिक वर्ष २०२६ च्या नऊमाहित १/ n आधारावर वेतन संहितेचा प्रभाव वगळता करपश्चात नफा २२.६७ अब्ज रुपये होता आणि त्यात १३.४ टक्के वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष २०२६ च्या नऊमाहिसाठी n आधारावर वेतन संहितेचा प्रभाव वगळता करपश्चात नफा २२.६४ अब्ज रुपये नोंदविला गेला असून त्यात १५.९ टक्के वाढ झाली आहे.

१/ n आधारावर करपश्चात नफा आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत ९.१ टक्क्याने घटून ६.५९ अब्ज रुपयांवर आला आहे. आर्थिक वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत तो ७.२४ अब्ज रुपये होता. आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत n आधारावर करपश्चात नफा ०.२ टक्क्याने वाढून ६.८० अब्ज रुपये झाला. आर्थिक वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत तो ६.७९ अब्ज रुपये होता. आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत वेतन संहितेचा परिणाम वगळता करपश्चात नफा ७.०० अब्ज रुपयांवर आला असून त्यात ३.३ टक्क्याने घट झाली आहे. आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत वेतन संहितेचा परिणाम वगळता हा नफा ७.२१ अब्ज रुपयांवर पोहचला असून त्यात ६.३ टक्के वाढ झाली आहे.

आर्थिक वर्ष २०२६ च्या नऊमाहित १/n आधारावर सरासरी समभाग परतावा (ROAE) १९.५ टक्के होता, तर आर्थिक वर्ष २०२५ च्या नऊमाहित तो २०.८ टक्के होता. आर्थिक वर्ष २०२६ च्या नऊमाहिसाठी १/n आधारावर ROAE चा परिणाम वगळता १९.८ टक्के होता.

आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत १/n आधारावर सरासरी समभाग परतावा (ROAE) १६.५ टक्के होता, तर आर्थिक वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत तो २१.५ टक्के होता. आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत १/n आधारावर वेतन संहितेचा प्रभाव वगळल्यास आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत RoAE १७.५ टक्के होता.

३१ डिसेंबर २०२५ रोजी सॉल्व्हन्सी गुणोत्तर २.६९ पट होते. ३० सप्टेंबर २०२५ रोजी २.७३ पट होते. किमान नियामक आवश्यकतेच्या दीड पटीपेक्षा अधिक गुणोत्तर राखण्यात कंपनीने यश मिळविले आहे. ३१ मार्च २०२५ रोजी सॉल्व्हन्सी गुणोत्तर २.६९ पट होते.

# कार्बन डायऑक्साइडमधून मिळणार मिथेनॉल इंधन




गुवाहाटी येथील भारतीय तंत्रज्ञान संस्थेतील (आयआयटी) संशोधकांनी सूर्यप्रकाशाच्या साहाय्याने कार्बन डायऑक्साइडचे रूपांतर मिथेनॉल इंधनात करणारा प्रकाश-उत्प्रेरक पदार्थ विकसित केला आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. पर्यावरणाची अधिक हानी न पोहोचता वाढत्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्याच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी हे संशोधन केले आहे.

या संशोधनाचे निष्कर्ष 'जर्नल ऑफ मटेरियल सायन्स या नियतकालिकात प्रकाशित झाले आहेत. 'पेट्रोलियमआधारित इंधनांवरील अवलंबित्वामुळे कार्बन डायऑक्साइडचे सर्वांत जास्त उत्सर्जन होते. यामुळे पर्यावरणावर ताण येऊन जागतिक तापमानवाढीत भर पडते. यावर उपाय म्हणून कार्बन डायऑक्साइडचे स्वच्छ इंधनांमध्ये रूपांतर करण्यासाठी प्रकाश-उत्प्रेरक पद्धती विकसित करण्यावर संशोधक काम करीत आहेत,'' असे आयआयटी गुवाहाटीच्या रासायनिक अभियांत्रिकी विभागातील प्रा. महुआ डे यांनी सांगितले.पर्यावरणासाठी निर्माण झालेले आव्हान पेलण्यासाठी तुलनेने स्वस्त, धातूविरहित आणि विषमुक्त असलेल्या ग्राफिटिक कार्बन नायट्राइडचा वापर जागतिक पातळीवर संशोधक करीत आहेत. मात्रा वेगाने होणारा ऊर्जाक्षय आणि इंधन निर्मितीचे प्रमाण कमी असण्याच्या मर्यादांमुळे अद्याप कोणताही ठोस व प्रभावी उपाय विकसित झालेला नाही. या त्रुटीवर उपाय म्हणून आयआयटी गुवाहाटीमधील संशोधकांच्या चमूने ग्राफिटिक कार्बन नायट्राईट आणि ग्राफीनच्या काही स्तरांचे मिश्रण केले. सध्याचे काम पर्यावरणीय समस्या कमी करण्यासाठी आणि त्याचबरोबर हरित ऊर्जेसाठी योगदान देण्यास हातभार लावेल, अशी अपेक्षा आहे. सौर ऊर्जेचा वापर करून कार्बन डायऑक्साइडचे हरित इंधनात रूपांतर करणे हे या दिशेने एक आशादायक तंत्रज्ञान आहे, असेही डे म्हणाल्या.

**संशोधनातील निष्कर्ष :** ग्राफीनच्या काही स्तरांमुळे दृश्यमान प्रकाश किंवा सूर्यप्रकाशाच्या संपर्कात कार्बन नायट्राईडची प्रकाश-उत्प्रेरक ऊर्जा साठवण क्षमतेत सुधारणा

उत्प्रेरक अधिक काळ सक्रिय राहतो.

प्रकाश शोषणात वाढ होऊन विद्युतभार निर्मितीत सुधारणा होते.

संमिश्र पदार्थांमध्ये १५ वजन टक्के ग्राफीन असलेल्या उत्प्रेरकाने कार्बन डायऑक्साइडचे मिथेनॉलमध्ये सर्वाधिक कार्यक्षमपणे रूपांतर केले.

व्यावहारिक उपयोगांसाठी महत्त्वपूर्ण मानली जाणारी उच्च स्थिरताही या उत्प्रेरकात आढळली आहे.

संशोधकांच्या आमच्या चमूद्वारे विकसित तंत्रज्ञानाचा उपयोग औष्णिक विद्युत प्रकल्प, सिमेंट उत्पादक केंद्रे, पोलाद उत्पादन केंद्रे आणि पेट्रोकेमिकल शुद्धीकरण प्रकल्प अशा उद्योगांमध्ये होऊ शकतो. यामुळे वर्तुळाकार कार्बनभोवतीच्या वर्तुळाकार अर्थव्यवस्थेकडे व भविष्यातील स्वच्छ ऊर्जेकडे जाण्यास प्रोत्साहन देईल.

# काळजी पशुधनाची

थंडीचा थेट परिणाम दुधाळ गाई-म्हशी, वासरे आणि इतर जनावरांच्या आरोग्यावर होतो. अनेक वेळा दूध उत्पादन कमी होते, जनावरे अशक्त होतात आणि आजारांचे प्रमाण वाढते. त्यामुळे थंडीच्या काळात जनावरांची विशेष काळजी घेणे शेतकऱ्यांसाठी खूप महत्त्वाचे ठरते.

हिवाळ्यात तापमान मोठ्या प्रमाणात कमी होते. या थंडीचा थेट परिणाम दुधाळ गाई-म्हशी, वासरे आणि इतर जनावरांच्या आरोग्यावर होतो. अनेक वेळा दूध उत्पादन कमी होते, जनावरे अशक्त होतात आणि आजारांचे प्रमाण वाढते. त्यामुळे थंडीच्या काळात जनावरांची विशेष काळजी घेणे शेतकऱ्यांसाठी खूप महत्त्वाचे ठरते.

**१. खाण्याची सवय आणि पोषण**

थंडीमध्ये जनावरांची भूक थोडी वाढते, कारण शरीर उबदार ठेवण्यासाठी जास्त ऊर्जा लागते. मात्र हिवाळ्यात कुरणात चांगले गवत कमी मिळते. अनेक वेळा जनावरे फक्त कोरडा चारा खातात. त्यामुळे प्रथिने व ऊर्जेची कमतरता निर्माण होते. याचा परिणाम थेट जनावरांच्या ताकदीवर आणि दूध उत्पादनावर दिसतो.

**२. पचनशक्तीवर परिणाम**

थंडीमुळे जनावरांच्या शरीरातील रक्तप्रवाह पोट, आतडी व पचनसंस्थेकडे कमी होतो. त्यामुळे अन्न नीट पचत नाही. विशेषतः लहान वासरांवर याचा जास्त परिणाम होतो. पचन कमजोर झाल्याने जनावरे लवकर थकतात आणि वजन घटते.

**३. दूध उत्पादन घटण्याची कारणे**

थंडीमध्ये सडांकडे जाणारा रक्तप्रवाह कमी होतो. तसेच शरीर उबदार ठेवण्यासाठी जास्त ऊर्जा खर्च होते. त्यामुळे दूध तयार होण्यासाठी लागणारी ऊर्जा कमी पडते आणि दूध उत्पादन घटते. जास्त काळ थंडी राहिल्यास दुधातील साखरेचे प्रमाणही कमी होऊ शकते.

**४. गाभण जनावरांवर व प्रजननावर परिणाम**

योग्य सकस चारा न मिळाल्यास गाभण जनावरांना अशक्तपणा येतो. काही वेळा गर्भधारणा उशिरा होते किंवा गाई पुन्हा गाभण राहत नाहीत. नवजात वासरे कमी वजनाची आणि कमजोर जन्माला येतात. चिकाची गुणवत्ता कमी झाल्यामुळे वासरांची प्रतिकारशक्तीही घटते.

**५. खनिजांची कमतरता व वाढीवर परिणाम**

हिवाळ्यात मॅग्नेशियमसारख्या खनिजांची कमतरता होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे भूक कमी होते आणि वाढ मंदावते. जनावरांची स्नायू वाढ नीट होत नाही आणि मांसाची गुणवत्ता घसरते.

**६. तीव्र थंडीतील धोके**

खूप जास्त थंडी पडल्यास जनावरांचे शरीराचे तापमान कमी होते. सड, कान आणि अंडकोष थंडीने जास्त बाधित होतात. गंभीर अवस्थेत जनावर बेशुद्ध पडू शकते आणि श्वासोच्छ्वास मंद झाल्याने मृत्यूचा धोका निर्माण होतो.



# मानवता आणि समतेचे सुवर्णशिखर : श्री हरमंदिर साहिब

भारतीय उपखंडाच्या इतिहासात अशी मोजकीच स्थळे आहेत, जी केवळ धार्मिक श्रद्धास्थान न राहता मानवी मूल्यांचा दीपस्तंभ बनली आहेत. अमृतसरचे 'श्री हरमंदिर साहिब' अर्थात सुवर्ण मंदिर हे त्यापैकीच एक. चहुबाजूंनी पसरलेले पवित्र अमृत सरोवर, त्यामध्ये झळाळणारे सुवर्ण मंदिर आणि कानावर पडणारे गुरबानीचे शांत स्वर... हे केवळ दृश्य नसून तो एक आध्यात्मिक अनुभव आहे जो शतकानुशतके जगाला शांती आणि बंधुत्वाचा संदेश देत आहे.

**सूफी संतांच्या हस्ते पायाभरणी: सर्वधर्मसमभावाचा वारसा :** या पवित्र वास्तूचा पायाच मुळी सामाजिक सलोख्यावर आधारलेला आहे. १५७७ मध्ये शीख धर्माचे चौथे गुरू गुरू रामदास साहिब यांनी या शहराचा पाया रचला. मात्र, मंदिराच्या निर्मितीचा संकल्प पाचवे गुरू गुरू अर्जुन देव साहिब यांनी पूर्णत्वास नेला. या मंदिराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, शिखांच्या या सर्वोच्च केंद्राची पायाभरणी एका मुस्लिम सूफी संताच्या, म्हणजेच हजरत मियाँ मीर साहिब यांच्या हस्ते करण्यात आली. हा प्रसंग आजही भारतीय संस्कृतीतील 'गंगा-जमुनी' तहजीबचा सर्वात मोठा पुरावा मानला जातो.

**वास्तुरचनेत दडलेली नम्रता आणि समानता :** जगातील बहुतेक धार्मिक स्थळे ही उंचीवर किंवा पर्वतावर असतात, परंतु श्री हरमंदिर साहिबची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. हे मंदिर जमिनीच्या पातळीपेक्षा खाली बांधले गेले आहे, जे 'नम्रतेचे' प्रतीक आहे. मंदिरात प्रवेश करण्यासाठी भाविकाला पायऱ्या उतरून जावे लागते, याचाच अर्थ ईश्वराच्या दारात येताना अहंकार त्यागून येणे आवश्यक आहे. तसेच, मंदिराची चार प्रवेशद्वारे हे दर्शवतात की, येथे येण्यासाठी जात, धर्म, वर्ण किंवा लिंगाचा कोणताही अडथळा नाही; हे द्वार सर्वांसाठी सदैव खुले आहे.

**महाराजा रणजित सिंह आणि 'सुवर्ण' झळाळी:** सुरुवातीला साध्या रचनेत असलेल्या या वास्तूला १९ व्या शतकात खऱ्या अर्थाने सुवर्ण झळाळी मिळाली. शिखांचे महान शासक महाराजा रणजित सिंह यांनी या मंदिराच्या घुमटावर आणि भिंतींवर सोन्याचे पत्रे अर्पण



केले. तेव्हापासून हे श्री'हरमंदिर साहिब' सातासमुद्रापार 'गोल्डन टेम्पल' म्हणून ओळखले जाऊ लागले.

"सुवर्ण मंदिर हे केवळ शिखांचे नाही, तर ते अखिल मानवजातीचे आध्यात्मिक आश्रयस्थान आहे."

**लंगर**

**जगातील सर्वात मोठी सेवा संस्कृती :** सुवर्ण मंदिराचा उल्लेख 'लंगर' सेवेशिवाय अपूर्ण आहे. कोणताही भेदभाव न करता, एकाच पंगतीत बसून हजारो लोक येथे प्रसाद ग्रहण करतात. ही परंपरा केवळ भूक भागवण्यासाठी नसून ती समाजातील उच्च-नीचतेची भिंत पाडण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. सेवा, त्याग आणि समर्पण या त्रिसूत्रीवर आधारलेली ही व्यवस्था आजही जगाला अचंबित करते.

**आधुनिक भारताचे सांस्कृतिक वैभव :** १६०४ मध्ये गुरू अर्जुन देव साहिब यांनी येथे 'आदि ग्रंथाची' प्रतिष्ठापना केली आणि हे स्थळ आध्यात्मिक ऊर्जेचे केंद्र बनले. आज २१ व्या शतकातही, हे मंदिर आपल्या मूळ मूल्यांशी घट्ट जोडलेले आहे. भारतीय लोकशाहीतील समानता आणि सहिष्णुतेचा आत्मा हरमंदिर साहिबमध्ये खऱ्या अर्थाने प्रतिबिंबित होतो.

**राहुल शोभाबाई लक्ष्मणराव भालेराव**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**पालघर**



# जेवणानंतर अन्न सहज पचण्यासाठी ही योगासने करा

पचन सुधारण्यासाठी योगासन : बऱ्याचदा, जेवणानंतर आपल्याला पोटात जडपणा, गॅस किंवा बद्धकोष्ठता यासारख्या समस्या येतात. हिवाळ्याच्या काळात ही समस्या विशेषतः सामान्य असते, कारण आपण जास्त हालचाल टाळतो. अशा परिस्थितीत, जड किंवा उलटी योगासनांमुळे पोटावर दबाव येऊ शकतो आणि अस्वस्थता वाढू शकते. तथापि, काही खास योगासन आहेत जे जेवणानंतर लगेच किंवा लगेचच करता येतात.

ही आसने पचन सुधारतात, पोट हलके करतात आणि चयापचय सक्रिय करतात. नियमित सराव केल्याने दुपारच्या जेवणानंतर जडपणा, पेटके आणि गॅस कमी होण्यास मदत होते. या लेखात, आम्ही निरोगी पोट राखण्यासाठी दुपारच्या जेवणानंतर दररोज करू शकणाऱ्या काही सोप्या योगासनांबद्दल जाणून घ्या.

**वज्रासन**

जेवणानंतर लगेच करण्यासाठी वज्रासन हे सर्वात सुरक्षित आणि प्रभावी योगासन मानले जाते. या आसनात, तुम्ही तुमचे पोट टाचांवर ठेवून गुडघ्यांवर बसता. तुमची पाठ नेहमी सरळ ठेवा आणि तुमचे हात गुडघ्यांवर ठेवा. या आसनात बसल्याने पोटावर हलका दाब पडतो, ज्यामुळे अन्न जलद पचण्यास मदत होते. याव्यतिरिक्त, वज्रासन चयापचय सक्रिय करते आणि पचनसंस्थेमध्ये रक्त प्रवाह सुधारते. नियमित सराव केल्याने पोटात जडपणा, गॅस आणि अपचन यापासून आराम मिळू शकतो.

**शशांकासन** - शशांकासन हे एक आरामदायी आणि हलके पचन योगासने आहे. या आसनात, तुम्ही तुमचे कपाळ आणि हात जमिनीवर ठेवून गुडघे टेकता आणि हळूहळू आणि नियंत्रित श्वास घेता. या आसनामुळे पोट आणि आतड्यांवर हलका दाब पडतो, ज्यामुळे रक्ताभिसरण वाढते. यामुळे पचनक्रिया जलद होते आणि पोटात पेटके, गॅस किंवा बद्धकोष्ठता यापासून आराम मिळतो. जेवणानंतर १०-१५ मिनिटांनी शशांकासन करणे सुरक्षित आहे.

**सुखासन**

सुखासनात सरळ बसून जेवणानंतर खोल आणि नियंत्रित श्वास घेणे पचनासाठी खूप फायदेशीर आहे. या सरावात नाकातून हळूहळू श्वास घेणे आणि हळूहळू श्वास सोडणे समाविष्ट आहे. खोल श्वास घेण्यामुळे पोटाच्या स्नायूंना हळूवारपणे मालिश होते आणि आतड्यांसंबंधी क्रियाकलाप वाढतात. यामुळे अन्न लवकर पचण्यास मदत होते आणि पोटात जडपणा किंवा गॅस कमी होतो. हे ५-१० मिनिटे करणे पुरेसे आहे.

**अर्ध मत्स्येंद्रासन**

अर्ध मत्स्येंद्रासनात, तुम्ही बसता आणि तुमचे शरीर थोडेसे वळवता, ज्यामुळे पोट आणि आतड्यांवर हलका दबाव येतो. हे सौम्य टोर्शन पचनसंस्था सक्रिय करते आणि अन्न लवकर पचण्यास मदत करते. हे आसन करताना तुमची पाठ सरळ ठेवा आणि तुमचा श्वास सामान्य ठेवा. हे आसन पोटाच्या स्नायू आणि आतड्यांना ताणते, ज्यामुळे गॅस आणि बद्धकोष्ठता कमी होते. हे खाल्ल्यानंतर सुमारे १०-१५ मिनिटांनी हळूवारपणे करता येते.

# या भाजीचा रस लावल्याने काही दिवसांतच सुरकुत्या दूर होतील

**त्वचेसाठी बटाट्याच्या रसाचे फायदे :** वय वाढत असताना, आपल्या चेहऱ्यावर सुरकुत्या आणि बारीक रेषा यासह वृद्धत्वाची चिन्हे दिसू लागतात. यामुळे आपले चेहरे निस्तेज आणि निर्जीव दिसू शकतात. बरेच लोक सुरकुत्या दूर करण्यासाठी विविध कॉस्मेटिक उत्पादने वापरतात.

सुरकुत्या दूर करण्यासाठी तुम्ही बटाट्यांसह काही घरगुती उपाय करून पाहू शकता. हो, बटाटे आपल्या घरात सहज उपलब्ध आहेत. बटाट्याच्या रसात व्हिटॅमिन बी ६ आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे सुरकुत्या आणि बारीक रेषा कमी करण्यास प्रभावी ठरू शकतात. त्याचा वापर केल्याने टॅनिंग देखील दूर होण्यास मदत होते. तर, सुरकुत्या दूर करण्यासाठी बटाट्याचा रस कसा वापरायचा ते जाणून घेऊया.

सुरकुत्या दूर करण्यासाठी

बटाट्याचा रस चेहऱ्यावर लावता येतो. हे करण्यासाठी, एक बटाटा किसून घ्या आणि रस पिळून घ्या. नंतर कापसाच्या बॉलच्या मदतीने सुमारे १५ मिनिटे बटाट्याचा रस चेहऱ्यावर लावा आणि नंतर साध्या पाण्याने चेहरा धुवा. त्याचा दररोज वापर केल्याने तुमची त्वचा घट्ट होईल. शिवाय, डागांची समस्या देखील दूर होईल.

**बटाट्याचा रस आणि मध:**

चेहऱ्यावरील सुरकुत्या दूर करण्यासाठी तुम्ही बटाट्याच्या रसात मध देखील वापरू शकता. यासाठी एका भांड्यात ३ चमचे बटाट्याचा रस घ्या आणि



त्यात १ चमचा मध घाला आणि मिक्स करा. आता ते तुमच्या चेहऱ्यावर लावा. सुमारे १५ मिनिटांनी, तुमचा चेहरा पाण्याने धुवा. यामुळे सुरकुत्या आणि बारीक रेषा हळूहळू कमी होऊ लागतील. शिवाय, तुमची त्वचा देखील मऊ होईल.

**बटाट्याचा रस आणि हळद**

जर तुमच्या चेहऱ्यावर सुरकुत्या असतील तर तुम्ही बटाट्याच्या रसात हळद पावडर मिसळून लावू शकता. एका भांड्यात २-३ चमचे बटाट्याचा रस घ्या आणि त्यात चिमूटभर हळद पावडर घाला. ही पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर लावा आणि पाण्याने धुण्यापूर्वी सुमारे १५ मिनिटे राहू द्या. तुम्ही हे आठवड्यातून १-२ वेळा वापरू शकता.

**बटाट्याचा रस आणि टोमॅटोचा रस:**

बटाट्याचा रस आणि टोमॅटोचा रस यांचे मिश्रण लावल्याने सुरकुत्या कमी होण्यास मदत होते. एका भांड्यात २ चमचे बटाट्याचा रस आणि २ चमचे टोमॅटोचा रस मिसळा. हे मिश्रण तुमच्या चेहऱ्यावर लावा आणि सुमारे १५ मिनिटांनी पाण्याने धुवा. बटाट्याचा आणि टोमॅटोचा रस चेहऱ्यावर लावल्याने वृद्धत्वाची लक्षणे कमी होतात.